## रुपाली चाकणकर यांचा राजीनामा

**मुंबई :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यावेळी खुद्द मुख्यमंत्र्यांनीच त्यांना राजीनामा देण्याचे आदेश दिले होते, अशी सूत्रांची माहिती होती. त्यानंतर चाकणकर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या भेटीला देवगिरी बंगल्यावर गेल्या होत्या. त्यांच्यासोबतच्या चर्चे नंतर चाकणकरांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. सुनेत्रा पवारांकडे त्यांनी पदाचा राजीनामा सुपूर्द केला आहे.


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २२ मार्च २०२६

किंमत ४₹




सी साईट रिसॉर्ट (नागांव)

कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे

संपर्क : ९४२२८५६३३६ ७३८५९६५८८५


# राज्यभरातील २,४४४ ग्रामपंचायतींची आता रणधुमाळी



- राज्यातील ४७१ सरपंच व ३१२० सदस्यांची निवडणूक होणार
- रायगडातील १२७ ग्रा. पं.मधील ३० सरपंच व १७० सदस्यांसाठी निवडणूक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**जिल्हा परिषद निवडणुकांनंतर आता राज्यात ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी रंगणार असून, रिक्त पदांसाठीच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. राज्यभरात ४७१ सरपंच आणि ३ हजार १२० सदस्य पदांसाठी निवडणुका होणार आहेत. रायगड जिल्ह्यातील १२७ ग्रामपंचायतींमधील ३० सरपंच आणि १७० सदस्य अशा एकूण २०० जागांसाठी ही निवडणूक लढवली जाणार असून, २८ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.**

जिल्हा परिषद निवडणुकीनंतर ग्रामपंचायत निवडणुका कधी लागणार याकडे सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागून होते. राज्यासह रायगड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींवर सध्या प्रशासकीय राजवट असून, काही ठिकाणी सरपंच व सदस्य पदे गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. राजीनामे तसेच इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांसाठी या पोटनिवडणुका घेतल्या जात आहेत.

**जिल्हानिहाय ग्रामपंचायतींवर दृष्टीक्षेप**

| जिल्हे | ग्रामपंचायत | थेट सरपंच | सदस्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| रायगड | १२७ | ३० | १७० | २०० |
| ठाण | ७८ | १५ | १०१ | ११६ |
| रत्नागिरी | ११४ | १४ | १६० | १७४ |
| सिंधुदुर्ग | १०५ | १२ | १४३ | १५५ |
| पुणे | १५५ | ३३ | २२६ | २५९ |
| सातारा | १३८ | ३४ | १७२ | २०६ |
| कोल्हापूर | १०० | ३९ | ८९ | १२८ |
| अहिल्यानगर | ६४ | ०५ | ८५ | ९० |
| नाशिक | १३३ | १२ | १९१ | २०३ |

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नाशिक, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहिल्यानगर, पुणे, सांगली, वर्धा, वाशिम, गोंदिया आदी ३४ जिल्ह्यांतील एकूण २ हजार ४४४ ग्रामपंचायतींमधील ४७१ थेट सरपंच व ३ हजार १२० सदस्य अशा एकूण ३ हजार ५९१ रिक्त जागांसाठी निवडणुका होणार आहेत.

३० मार्चपासून निवडणूक प्रक्रियेचा प्रशासकीय टप्पा सुरू होणार आहे. तहसीलदारांकडून निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ४ ते १३ एप्रिलदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. १५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी होणार असून, १७ एप्रिलला अर्ज माघार घेण्याची प्रक्रिया पार पडेल. त्याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. २८ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदानास सुरुवात होणार असून, २९ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

रायगड जिल्ह्यातील १२७ ग्रामपंचायतींमध्ये ३० थेट सरपंच आणि १७० सदस्य पदांसाठी निवडणूक होत असून, एकूण २०० जागांसाठी चुरस पाहायला मिळणार आहे. दरम्यान, अनेक ग्रामपंचायतींचा कारभार सध्या प्रशासकाच्या हाती असून, त्या ठिकाणी लवकरच लोकशाही राजवट प्रस्थापित होणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून, हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात राजकीय वातावरण चांगलेच तापण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात



● (छायाचित्र : सुधीर नाझरे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली. महिनाभर कडक रोजा (उपवास) केल्यानंतर मुस्लिम बांधवांनी शनिवारी ईद साजरी करत एकात्मतेचा संदेश दिला. जिल्ह्यातील तब्बल २५२ ठिकाणी नमाज अदा करण्यात आला. यामध्ये २३२ मशिदी आणि २१ दर्ग्यांमध्ये हजारो मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सकाळी नवीन कपडे परिधान करून सर्वांनी सामूहिक नमाज अदा केली आणि एकमेकांना गळाभेट देत ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या.

रमजान महिन्यात उपवास केल्यानंतर चंद्रदर्शन ●➤ पान २ वर









## कच्च्या रस्त्याने घेतला कामगाराचा बळी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मोठा गाजावाजा करीत माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दोन वर्षांपूर्वी रस्त्याचे उद्घाटन झाले, पण प्रत्यक्षात रस्ता आजही कच्चाच आहे. परिणामी, त्याच निष्काळजीपणामुळे एका निरपराध कामगाराचा बळी गेला आहे. कर्जत तालुक्यातील माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या आदिवासी वाड्यांना जोडणाऱ्या अपूर्ण रस्त्यामुळे सखाराम हाशा सांबरे यांचा मृत्यू झाल्याने प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांवर तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आसलवाडी येथील सखाराम सांबरे हे माथेरान गिरी नगरपरिषदेमध्ये सफाई कामगार होते. कामावरून परतल्यानंतर प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात नेत असताना कच्च्या आणि अपूर्ण ●➤ पान २ वर

## छत्रपती शाहू महाराज सभागृहाची दुरवस्था



- कोट्यवधींचा निधी ‘लालफितीत’
- प्रशासनाचा निष्काळजीपणा उघड

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते आरक्षणाचे जनक म्हणून संबोधले जाणारे छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने उभारलेले सभागृह आज अक्षरशः उद्ध्वस्त झाले असून, इमारत गवताच्या विळख्यात सापडली आहे. एकीकडे प्रशासनाच्या निष्क्रियतेचा हा जिवंत पुरावा ठरत असताना, दुसरीकडे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिलेल्या ऐतिहासिक स्थळांच्या सुशोभीकरणाच्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

महाड येथील क्रांतीभूमीत उभारण्यात आलेले छत्रपती शाहू महाराज सभागृह २००६ साली मोठ्या थाटामाटात लोकार्पित झाले होते. मात्र, आज या इमारतीची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. ठिकठिकाणी भगदाडे, मोडकळीस आलेल्या भिंती, उद्ध्वस्त स्वच्छतागृहे आणि सभागृहाभोवती वाढलेले गवत यामुळे ही वास्तू अक्षरशः पडीक झाली आहे. परिसरात घाणीचे ●➤ पान २ वर






## पालीचे अन्नछत्र बंद

**। पाली । प्रतिनिधी ।**

इराण-इस्त्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या गॅसटंचाईचा फटका आता अष्टविनायक तीर्थक्षेत्रालाही बसू लागला आहे. पालीतील बल्लाळेश्वर गणपती मंदिर येथे भाविकांसाठी चालणारे अन्नछत्र मागील दहा दिवसांपासून बंद आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा ठप्प झाल्याने देवस्थान समितीला हा निर्णय घ्यावा लागला आहे.

दररोज देशभरातून येणाऱ्या हजारो भाविकांपैकी सुमारे ४०० हून अधिक भाविक अन्नछत्राचा लाभ घेत होते. एप्रिल-मे महिन्यात ही संख्या आणखी वाढत असते. मात्र, अन्नछत्र बंद झाल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत आहे. याचबरोबर प्रसाद म्हणून दिला जाणारा लाडूही उपलब्ध नसल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ●➤ पान २ वर







# इंग्रजी शाळांमध्ये मिळणार मोफत प्रवेश

## आरटीई प्रवेशासाठी २५ मार्चपर्यंत मुदतवाढ; पालकांना ५ किमी अंतरातील निवडता येणार शाळा


(संग्रहित छायाचित्र)

। रायगड । प्रतिनिधी ।

शिक्षणाचा हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव प्रवेशासाठी सध्या ऑनलाइन अर्ज करणे सुरू आहे. या ऑनलाइन प्रक्रियेत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्देशानुसार शाळेच्या अंतराची एक किलोमीटरची अट शिथिल करण्यात आली आहे. त्यानुसार आता पालकांना एक ते पाच किलोमीटरपर्यंतच्या शाळा निवडण्याची संधी मिळणार आहे. अर्जात दुरुस्ती किंवा नवीन अर्ज करण्यासाठी २५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आतापर्यंत राज्यातील आठ हजार ८९९ शाळांमधील एक लाख १४ हजार ७३२ राखीव जागांसाठी दोन लाख ४० हजार ४११ पालकांनी राखीव प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज केले आहेत. ऑनलाइन अर्ज करण्यासाठी मुदत वाढविण्यात आल्याने अर्ज संख्या वाढण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, १२ फेब्रुवारी रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार आरटीई प्रवेशासाठी पालकांना केवळ निवास स्थानापासून एक किलोमीटर अंतरातील शाळाच निवडण्याची मुभा होती. शालेय शिक्षण विभागाच्या या निर्णयाविरोधात पालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. याचिकेवरील सुनावणीवेळी न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत एक किलोमीटरची सक्ती योग्य नसल्याचे स्पष्ट केले. जर एखाद्या विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरच्या परिसरात शाळा उपलब्ध नसेल, तर त्या विद्यार्थ्याला अधिक अंतरावरील शाळेत प्रवेश घेण्यापासून रोखणे अन्यायकारक ठरेल. त्यामुळे शासनाने नियमांमध्ये सुधारणा करून पालकांना अधिक अंतरावरील शाळांचे पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश न्यायालयाने दिले.

आता प्राधान्याने एक किलोमीटर, त्यानंतर तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर अंतरातील शाळांचे पर्याय पालकांना निवडता येईल. तसेच १६ मार्चपर्यंत ज्या पालकांनी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज केले आहेत, त्यांना अर्ज अनकन्फर्म करून पुन्हा कन्फर्म करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालकांना पोर्टलवर पॉप-अप विंडोच्या माध्यमातून सूचना देण्यात येणार आहे.

### रायगड जिल्ह्यातून प्रवेशाच्या दुप्पट अर्ज

आरटीई प्रवेशात रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील २७० शाळांमध्येदेखील सामान्य कुटुंबातील चार हजार ७८४ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश मिळणार आहे. आतापर्यंत आठ हजारांहून अधिक पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज केले आहेत. मुदतवाढीमुळे पुढील पाच दिवसांत आणखी अर्ज वाढतील. प्रवेश क्षमतेच्या दुप्पट अर्ज असल्याने मोफत प्रवेशाची लॉटरी कोणाला लागणार, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## जुन्या वादातून काठीने मारहाण

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

जुन्या पैशाच्या वादातून ४८ वर्षीय इसमाला मारहाण केल्याप्रकरणी बालाजी गंगनमले आणि नवनाथ गंगनमले यांच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात १७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ईश्वर हिप्परकर हे कळंबोली सेक्टर २० येथे राहात असून, त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. बालाजी गंगनमले हे त्यांच्या ट्रान्सपोर्टमध्ये भागीदार होते. मात्र, पैशांमुळे वाद झाल्याने भागीदारी तोडली. १४ मार्च रोजी पाच नंबर पार्किंग कळंबोली येथे बालाजी गंगनमले याने माझे पैसे कधी देणार यावरून ईश्वर यांना शिवीगाळ केली व नवनाथ याने नाकावर जोरात बुक्की मारली. त्यामुळे त्यांच्या नाकपुड्यातून रक्त आले. त्यानंतर नवनाथ याने काठीने मारहाण केली. त्यानंतर त्यांना एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले.

## २२ लाख ८० हजारांची फसवणूक

### तिघांविरोधात गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

दोन प्लॉटची दुसऱ्यांना विक्री करून २२ लाख ८० हजारची फसवणूक केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात १६ मार्च रोजी रमेश रामचंद्र कल्याणकर, रसिक रमेश कल्याणकर आणि रचना रमेश कल्याणकर (राहणार सेक्टर १२ नवीन पनवेल) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

कॅप्टन संतोष परशुराम शर्मा (८१) हे सेवानिवृत्त असून, ते सिक्युरिटी एजन्सी चालवतात. २००६ मध्ये त्यांची मुले द्वीरेफ संतोष शर्मा आणि प्राशीन शर्मा व संतोष शर्मा यांनी तळोजा मजकूर तळोजा फेस टू येथील द्वारका बंगलो स्कीम या नावाने दोन ओपन प्लॉट रमेश कल्याणकर यांच्याकडून करारनामा करून दुय्यम निबंधक पनवेल तीन येथे खरेदीखत केले होते. प्लॉट क्रमांक ४१ आणि ४२ दोन्ही प्लॉट आर आर कल्याणकर कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे प्रोप्रा रमेश कल्याणकर यांच्याकडून खरेदी करण्यात आले. त्यानुसार त्यांना २२ लाख ८० हजार ८४० रुपये देण्यात आले. त्यांनी प्लॉटवर दोन्ही प्लॉट त्यांच्या मालकीच्या असल्याबाबत बोर्ड लावला. १५ फेब्रुवारी रोजी ते प्लॉट पाहणी करण्यासाठी गेले असता प्लॉट नंबर ४२ वर पत्रा शेड मारल्याचे दिसून आले आणि तेथील बोर्ड आणि झाडे तोडून टाकल्याचे दिसले. यावेळी सदरची शेड संतोष सिंग आणि ब्रिजेश सिंग यांचे असल्याचे समजले. त्यांनी सदरचा प्लॉट प्रीतपाल सिंग यांच्याकडून भाडेतत्त्वावर घेतल्याचे सांगितले. तसेच प्लॉट नंबर ४१ हा अन्य इस्माने खरेदी केल्याची माहिती दिली. त्यामुळे संतोष शर्मा यांनी दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल येथे जाऊन पाहणी केली त्यावेळेस प्लॉट नंबर ४१ हा अब्दुल राखे तर प्लॉट नंबर ४२ हा प्रितपाल सिंह यांना विक्री केल्याचे दिसून आले.

## निवडक



### रोजगार मेळावा संपन्न

**नवीन पनवेल** : दिनेश मांडवकर आणि विश्वास पाटील यांच्या माध्यमातून विद्याधर चोरघे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने रोजगार मेळाव्याचे आणि शिवसेना जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयटीआय, फिटर, इलेक्ट्रिशन, प्लांट मशीन ऑपरेटर, लॅब असिस्टंट या पदासाठी अनेक युवक-युवती यांनी रोजगार मेळाव्याचा फायदा घेतला. यावेळी नगरसेवक रामदास शेवाळे, दुन्द्रेचे सरपंच सुभाष भोपी, माजी सरपंच भारत भोपी, माजी उपसरपंच धनंजय पाटील यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

### ११ ग्रामपंचायतींसाठी निवडणुका

**म्हसळा** : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार म्हसळा तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या अंतर्गत ११ ग्रामपंचायतींसाठी सार्वत्रिक निवडणुका, तर तीन ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणुका होणार आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार तहसिलदार कार्यालयामार्फत ३० मार्च २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी ७ ते १३ एप्रिलदरम्यान राहील, तर १४ एप्रिल रोजी छाननी होईल. अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत १५ एप्रिल असून, १७ एप्रिल रोजी अंतिम उमेदवारांची यादी व निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल. आवश्यकतेनुसार मतदान प्रक्रिया २८ एप्रिल रोजी पार पडेल, तर मतमोजणी व निकाल २९ एप्रिल रोजी जाहीर होणार आहेत. अंतिम अधिसूचना ६ मे २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे. सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मांदाटणे, तुरुंबाडी, आंबेत, मेंदडी, रोहिणी, कोळे, खामगाव, खारगाव खुर्द, खारगाव बुद्रुक, गोंडघर आणि चिखलप या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. तर केल्टे, पाभरे आणि लिपणीवावे येथे पोटनिवडणुका होणार आहेत. या निवडणुकांमुळे म्हसळा तालुक्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत असून, इच्छुक उमेदवारांनी तयारीला सुरुवात केली आहे.

### हद्दपार केलेला आरोपी सापडून आल्याने केला गुन्हा दाखल

**नवीन पनवेल** : दोन वर्षांकरिता हद्दपार केलेल्या आरोपी कळंबोली परिसरात सापडून आल्याने ऋतिक रवींद्र पगारे (वय २१ रा. सेक्टर चार कळंबोली)याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ऋतिक पगारे याला नवी मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. मात्र हद्दपार केलेला असतानाही तो घरासमोरील गार्डनमध्ये बसलेला दिसून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

## कारची काच फोडून लॅपटॉप, मोबाईलची चोरी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

कारची काच फोडून चोराने लॅपटॉप बॅग, लॅपटॉप आणि मोबाईलची चोरी केली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १६ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. धनंजय बटवाल हे कोपरखैरणे येथे राहात असून, १६ मार्च रोजी कार घेऊन इस्कॉन मंदिर, खारघर येथे गेले. त्यांनी मेन गेटसमोर गाडी पार्क केली. दर्शन घेऊन आले असता त्यांना दरवाजाची काच फुटलेली दिसली. यावेळी चोराने मोबाईल लॅपटॉप चोरून नेला.

## प्रमोद देशमुख यांना पितृशोक

। माणगाव । प्रतिनिधी ।



माणगाव येथील उपकृषी अधिकारी प्रमोद धोंडीराम देशमुख यांचे वडील धोंडीराम (अण्णा) विठ्ठल देशमुख यांचे मंगळवार, १७ मार्च रोजी दुपारी तीन वाजता राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते.

कै. देशमुख हे शांत, संयमी व मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांचे मूळ गाव महाड तालुक्यातील वरंध असून, नंतर ते माणगाव येथे वास्तव्यास होते. गेल्या काही दिवसांपासून प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, बहीण, दोन मुलगे, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच माणगाव परिसरातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी येऊन श्रद्धांजली अर्पण केली. कै. देशमुख यांच्या पार्थिवावर महाड तालुक्यातील वरंध येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी २६ मार्च रोजी, तर उत्तरकार्य (तेरावा) २९ मार्च रोजी वरंध येथे होणार असल्याच कुटुंबियांनी सांगितले.

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांचे २३ मार्चला आझाद मैदानात धडक आंदोलन

। खारेपाट । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ११ महिने प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगार प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ युवा प्रशिक्षणार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने २३ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे राज्यस्तरीय धडक आंदोलन करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यासह राज्यभरातून हजारोंच्या संख्येने प्रशिक्षणार्थी या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

यापूर्वी ५ मार्च २०२६ रोजी आझाद मैदान येथे भव्य मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी प्रशिक्षणार्थ्यांनी ज्या शासकीय कार्यालयांमध्ये प्रशिक्षण घेतले, त्याच ठिकाणी कंत्राटी पद्धतीने प्राधान्याने रोजगार द्यावा, अशी प्रमुख मागणी शासनाकडे करण्यात आली होती. या आंदोलनात संघटनेचे विविध पदाधिकारी तसेच राज्यातील अनेक जिल्ह्यांतील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, १७ मार्च रोजी विधानभवनात या प्रश्नावर चर्चा झाली होती. आमदार सत्यजित तांबे, अभिजीत वंजारी, विक्रांत पाटील आणि विक्रम काळे यांनी हा मुद्दा प्रभावीपणे मांडला होता. त्यानंतर मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी तीन महिन्यांत प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, गेल्या चार महिन्यांपासून प्रशिक्षणार्थी बेरोजगार असल्याने त्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत.

युवकांची उपासमार टाळण्यासाठी शासनाने तातडीने लेखी निर्णय घेऊन रोजगाराबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. अन्यथा २३ मार्च रोजीचे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# भोंदूबाबाच्या जाळ्यात बडे नेतेही?

## फोटो व्हायरल होताच राजकारणात खळबळ; तटकरेही चर्चेत

। रायगड । प्रतिनिधी ।





स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. महिलांवरील लैंगिक शोषण आणि छळाच्या गंभीर आरोपांमुळे अटकेत असलेल्या खरात याचे अनेक प्रभावशाली व्यक्तींशी असलेले संबंध एकामागोमाग समोर येत आहेत. यात आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष तथा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांचे नाव पुढे आल्याने प्रकरण अधिकच गाजू लागले आहे.

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे वास्तव्यास असलेल्या खरात याच्यावर महिलांच्या शोषणाचे गंभीर आरोप असून, त्याच्या घरातून शस्त्रे आणि काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. तपासादरम्यान अनेक राजकारणी, सेलिब्रिटी आणि प्रभावशाली व्यक्तींशी त्याचे संबंध असल्याचे उघड झाले आहे. विशेषतः काही राजकीय नेत्यांशी असलेली त्याची जवळीक चर्चेचा विषय ठरत आहे.दरम्यान, तटकरे यांचे खरातसोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. हे फोटो खरातच्या मुलाच्या लग्नातील असल्याचे सांगितले जात असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यापूर्वीही काही नेत्यांचे फोटो समोर आले होते, मात्र तटकरे यांच्या नावामुळे या प्रकरणाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

या प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्यासह इतर काही नेत्यांचेही फोटो आणि व्हिडिओ याआधी समोर आले होते. त्यामुळे या संबंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यात येत असून, या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, तपास यंत्रणा या प्रकरणाचा बारकाईने तपास करत आहे.

## चिंचवलीत २५ मार्चला छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबीर

। वाघ्रण । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चिंचवली ग्रामपंचायत कार्यालयात २५ मार्च रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबीर' आयोजित करण्यात आले आहे. कामार्ले महसूल मंडळाच्यावतीने नागरिकांना विविध महसुली सेवा व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या शिबिरात फेरफार प्रलंबित कामे, ७/१२ मधील दुरुस्त्या, डिजिटल उतारे वाटप, रहिवासी, उत्पन्न व जात प्रमाणपत्रे, विद्यार्थी दाखले, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, तसेच विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच एन.ए. जमीन संदर्भातही माहिती देण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी तहसीलदार विक्रम पाटील आणि उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, यासाठी मंडळ अधिकारी व तलाठी कर्मचारी गावपातळीवर जनजागृती करत असून, सामाजिक माध्यमांद्वारेही आवाहन करण्यात येत आहे.

## किरकोळ वादावरून मारहाण, तिघांविरोधात गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

ऑफिसमध्ये झालेल्या किरकोळ वादावरून एकाला बांबू आणि पेवर ब्लॉकच्या सहाय्याने मारहाण केल्याप्रकरणी अविनाश गुरुनाथ राठोड (कुकशेत, नेरूळ) रितेश गुरुनाथ राठोड (नेरूळ), अंश समीर हांडे (सेक्टर १९, उलवे) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १७ मार्च रोजी पुन्हा दाखल करण्यात आला.

योगेंद्र चौधरी (वय ३०) हा खारघर सेक्टर १२ येथे राहत असून त्यांच्या कंपनीत रोहन चव्हाण अविनाश राठोड हे काम करतात. १६ मार्च रोजी रोहन चव्हाण हा व्हॅगनार कारने जात होता. यावेळी ऋतुराज तिवारी हा गाडीत होता. अविनाश राठोड हा त्याचा भाऊ रितेश राठोड चालवत असलेल्या बुलेटवर मागे बसला. अंश हांडे हा दुसरी दुचाकी चालवत होता. त्यावेळी रोहन चव्हाण याच्या चार चाकी गाडीला खुटारी गावच्या कमानीच्या समोरील रस्त्यावर ओव्हरटेक करून रोहनची गाडी थांबवण्यात आली. अविनाश याने रोहन याला ऑफिसमध्ये झालेल्या किरकोळ वादावरून बाहेर खेचले आणि बांबू आणि पेवर ब्लॉकच्या साहाय्याने मारहाण केली. त्या मारहाणीत रोहन गंभीर जखमी झाला. त्याला खारघर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## कारच्या धडकेत एक ठार

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

रस्ता ओलांडणाऱ्या ६३ वर्षीय शिवाजी जबाजी खंदारे यांना होंडा सिटी मोटर कारने धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी कार क्रमांक एमएच १२ एमबी ०१३६ वरील चालक अमर सईद सय्यद (रवी बाजारपेठ, लक्ष्मी रोड, पुणे) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १९ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. १८ मार्च रोजी शिवाजी खंदारे (रा. मालधक्का पनवेल रेल्वे स्टेशन) हे संध्याकाळी सात वाजता जेएनपीटी हायवेवर कंटेनरला रस्ता दाखवण्याचे काम करण्यासाठी गेले होते. रात्री पावणेदहाच्या सुमारास ते जेएनपीटी हायवेवर जेएनपीटी कडून पळस्पेकडे जाणाऱ्या लेनवर निलेश धाब्यासमोर रस्ता क्रॉस करत होते. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या होंडा सिटी कारने त्यांना धडक दिली.

## श्रीराम जन्मोत्सव सोहळा

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

श्रीराम मंदिर, शिवणसई-आंबे येथे २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्रींची पूजा आणि अभिषेक तसेच कीर्तन, महाप्रसाद, भजन, पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी नरेश कुमार अग्रवाल, अभिनेते अतुल अग्निहोत्री, रामशेठ ठाकूर, जे.एम. म्हात्रे, आ. प्रशांत ठाकूर, आ. विक्रांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## दागिने, रोख रकमेची चोरी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

बंगल्याची लोखंडी जाळी उचकटून आतमध्ये प्रवेश करून चोरांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात १७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सुरेंद्रकुमार अशोक सिंग हे सेक्टर १२, नवीन पनवेल येथे राहात असून, ते त्यांच्या गावी गेले होते. १६ मार्च रोजी गावाहून परत आले असता हॉलच्या दरवाजाचे लॅच तुटलेले दिसले. यावेळी घरातील सर्वसामान अस्ताव्यस्त पडलेले होते. चोरांनी बंगल्याच्या बाथरूमच्या खिडकीची लोखंडी जाळी उचकटून आत प्रवेश केला आणि एक लाख ९६ हजार रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

पान १ वरून

## जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात

झाल्यावर ईद साजरी करण्यास सुरुवात झाली. विशेष म्हणजे, ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांनीही रोजा पाळून धार्मिक परंपरेचे पालन केले. यामुळे संपूर्ण मुस्लिम समाजात वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. ईदनिमित्त घराघरांत शीरखुर्मा, बिर्याणी, पुलाव यांसारख्या पारंपरिक पदार्थांची रेलचेल होती. तसेच विविध संस्था आणि संघटनांकडूनही मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या.

दरम्यान, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी रायगड पोलिसांकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अनेक ठिकाणी पोलिसांनी भेट देत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. या सणाच्या निमित्ताने जिल्ह्यात सर्वत्र बंधुभाव, शांतता आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले.

## शाहू महाराज सभागृहाची दुरवस्था

साम्राज्य पसरले असून, कोणतीही देखभाल होत नसल्याचे स्पष्ट दिसते.

शाहू महाराजांनी समाजातील विषमता दूर करत दलित, वंचित घटकांसाठी शिक्षण, पाणी व मंदिरांचे दरवाजे खुले केले. त्यांच्या कार्याची आठवण जपण्यासाठी उभारलेले हे सभागृह आज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे उद्ध्वस्त होत आहे, ही मोठी शोकांतिका आहे.

दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे उभारलेल्या समानतेच्या लढ्याच्या स्मृती जपण्यासाठी शासनाने सुशोभीकरणासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर केल्याचे सांगितले जाते. मात्र, हा निधी वर्षानुवर्षे लालफितीत अडकून पडला असून, प्रत्यक्षात कोणतेही काम झालेले नाही. परिणामी, ऐतिहासिक वारसा जपण्याऐवजी तो नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, 'निधी मंजूर होतो, पण काम का होत नाही?' असा थेट सवाल प्रशासनाला विचारला जात आहे. ऐतिहासिक वारशाचा असा अवमान करणाऱ्या निष्क्रिय प्रशासनावर कठोर कारवाई करावी आणि तातडीने सभागृहाचे नूतनीकरण व सुशोभीकरण करावे, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

## कच्च्या रस्त्याने घेतला कामगाराचा बळी

रस्त्यामुळे वेळेत उपचार मिळू शकले नाहीत. अखेर अर्ध्या रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला.या रस्त्याचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र, दोन वर्षे उलटूनही रस्ता पूर्ण झाला नाही. उद्घाटनाचे फीत कापून फोटो काढण्यापुरतेच काम झाले, पण प्रत्यक्षात नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा उभा राहिला, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या १२ आदिवासी वाड्यांना जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता आजही अपूर्ण असून, अनेक वर्षांपासून नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. वारंवार आंदोलने, उपोषणे करूनही प्रशासनाने दुर्लक्षच केल्याचा आरोप होत आहे.

"फीत कापली, पण रस्ता दिला नाही; मग जबाबदार कोण?" असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत. आणखी किती जीव गेल्यावर सरकार आणि प्रशासन जागे होणार, असा संतापजनक प्रश्न आता पुन्हा ऐरणीवर आला असून, तातडीने रस्ता पूर्ण करण्याची जोरदार मागणी होत आहे.

## पालीचे अन्नछत्र बंद

परिसरातील हॉटेल व्यवसायही गॅसअभावी विस्कळीत झाल्याने जेवणाची व्यवस्था करणे कठीण झाले आहे.

भाविकांना केवळ ३० रुपयांत मुबलक भोजन देणारी ही सेवा पूर्णतः सेवाभावी स्वरूपाची आहे. मात्र, व्यावसायिक गॅस पुरवठा बंद झाल्याने अन्नछत्र थांबवावे लागले आहे. शासनाने विशेष बाब म्हणून गॅस पुरवठा सुरळीत केल्यास अन्नछत्र व प्रसाद सेवा तात्काळ सुरू करू, अशी माहिती पाली बल्लाळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी दिली.

## अनधिकृत शाळेप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

अनधिकृत शाळा सुरू ठेवल्याप्रकरणी सनराइज (सनशाईन) इंग्लिश स्कूल वावंजे येथील संस्थाचालक इरफान शेख आणि मुख्याध्यापक मारिया दारूवाले यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अनधिकृत शैक्षणिक संस्था बंद करून त्या विद्यार्थ्यांना नजीकच्या मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेत दाखल करावे, तसेच शासन नियमानुसार असलेला दंड भरून शाळा बंद करावी आणि संस्था बंद केल्याबाबत हमीपत्र सादर करावे, अशा संदर्भात अनधिकृत शाळांना पनवेल गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर ही सनराईज (सनशाईन) इंग्लिश स्कूल वावंजे ही मान्यता प्रमाणपत्र शिवाय अनधिकृतरित्या सुरू असल्याने त्या शाळेला गटशिक्षणाधिकारी यांनी भेट दिली. यावेळी शाळा सुरू असल्याचे दिसून आले. त्यामुळे इरफान शेख आणि मारिया दारूवाले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## वेदक महाविद्यालयात निरोप समारंभ

। तळा । प्रतिनिधी ।




जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स येथे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. टी.वाय. बी.एस्सी. व एम.एस्सी. विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रा. डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जीवनात प्रामाणिकपणा, मेहनत आणि ज्ञानाचा योग्य वापर करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात पुरुषोत्तम मुळे यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात विविध प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण व करिअरबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मनोगतातून महाविद्यालयातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी वरिष्ठांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


(छायाचित्र: सुधीर नाझरे)

# नवाबकालीन इदगाहवर नमाज

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

मुरुड परिसरात रमजान ईद हा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. पूर्ण महिनाभर निर्जल उपास पकडून (अल्ला) ईश्वराची भक्ती केली जाते व अमावस्येनंतर पहिली चंद्र कोर पाहून ईद साजरी केली जाते. यावेळी ईदची पहिली नमाज शनिवारी (दि.२१) येथील नावाबकालीन इदगाहवर मुस्लीम बांधवांकडून अदा करण्यात आली. नमाज होताच मुरुडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व सहकाऱ्यांनी मुस्लीम बांधवाना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सर्व मुस्लीम बांधवांनी देखील एकमेकांना ईदच्या शुभेच्या दिल्या.

हिंदू बांधवांची दिवाळी तशीच मुस्लिम बांधवाची रमजान ईद. त्यामुळे या दिनी मुस्लिम बांधव नवीन वस्त्र परिधान करून नमाज अदा करतात. आपल्या कुटुंबाच्या सुखासाठी ते प्रार्थना करतात. या दिवशी अदा केलेली नमाज सलात-अल-फज्र या नावाने ओळखली जाते. शनिवारी राजपुरी गावच्या मुस्लीम बांधवांनी सकाळी ७.०० वाजता ईदची पहिली नमाज जंजिरा किल्ल्यासमोर असलेल्या इदगाहवर अदा केली. ही परंपरा खूप वर्षांपासून सुरु आहे.

संपूर्ण महिना प्रामाणिकपणे रोजा पूर्ण करण्यासाठी शक्ती, ताकद दिल्याबद्दल ईद दिनी अल्लाहचे आभार मानले जातात. भूख, तहान यांची जाणीव माणसांना व्हावी, या उद्देशाने रमजान महिन्यात रोजे ठेवले जातात. रोजा ठेवणे आद्य कर्तव्य मानले जाते.



## रोह्यात रमजान ईद उत्साहात

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोह्यातील मुस्लिम बांधव व भगिनींनी रमजान ईद पहाटे नमाज अदा करुन मोठ्या उत्साहात साजरी केली. विशेष म्हणजे ईदच्या अनुषंगाने हिंदू बांधवांनी देखील शुभेच्छा देत हिंदू-मुस्लिम ऐकतेचा संदेश दिला. नमाजानंतर पोलीस प्रशासनाने मस्जिदीसमोर मुस्लिम बांधवांना गुलाब देऊन शुभेच्छा दिल्या.

रमजान ईदच्या निमित्ताने रोहे शहरातील जामा मस्जिद, मस्जिद ए अबू बकर, सलमान फारसी मस्जिद, वरचा मोहल्ला मस्जिद, अष्टमी जामे मस्जिद त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील कोकबन, न्हावे, सूडकोली, खैरे खुर्द, चणेरा, चांडगावं, कोलाड, नागोठणे व बेणसे येथील मशीदीत पहाटे ईदची नमाज अदा केल्यानंतर मौलवी यांनी खुतबा पठण केले. नमाज पठण केल्यानंतर समाजाचे अध्यक्ष, सचिव, पोलीस निरीक्षक सुयश कुमार सिंग, सपोनि सूर्यकांत पवार, तसेच मस्जिद अध्यक्ष हाफिज एजाज किरकिरे, अलीम मुमेरे, मौलाना मसरूर अलम, अब्बास आली अनवारे, जमीर कर्जिकर व पदाधिकाऱ्यांनी सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## माणगावात रमजान ईद साजरी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

ईद-उल-फित्र म्हणजेच रमजान ईद माणगाव तालुक्यात शनिवारी (दि.२१) सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. या ईदनिमित्त मुस्लिम बांधवानी ईदची मशिदीमध्ये सामुदायिक नमाज (प्रार्थना) अदा केल्यावर गळाभेट आलिंगन देत एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. माणगाव तालुक्यातील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारटेप मोहल्ला, नाणोरे, लोणशी, मोर्बा, साई, निजामपूर, दहिवलीकोंड, दहिवली, तारणा, वडवली, मांजरवणे, नांदवी, पुरार, वणीमलई कोंड, हारकोल, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, देवळी, टोळ, टोळ खुर्द आदी सर्वच गावांतून रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत मुस्लिम बांधवानी रमजान ईदची सामुदायिक नमाज अदा केली.



## रमजान ईदनिमित्त नमाज अदा

**| उरण | प्रतिनिधी |**



उरणमधील मुस्लीम बांधवांनी रमजान ईदनिमित्त नमाज अदा केला. येथील जामा मस्जिदमध्ये सकाळी ८.०० वाजता पहिली नमाज तर दुसरी नमाज ९.०० वाजता अदा केली. मदरसा मेहमुदिया खिडकोळी नाका येथे सकाळी पावणेआठ वाजता पहिली नमाज, तर दुसरी नमाज अदा केली. खाजा गरीब नवाज सुंनी हनफी मदरसा बालई रोड येथे सकाळी सव्वासात वाजता पहिली नमाज, तर दुसरी नमाज ८.०० वाजता अदा केली. शंकर पीर दर्गा मदरसा करंजा रोड येथे सकाळी पावणेआठ वाजता पहिली नमाज, तर दुसरी नमाज साडेआठ वाजता अदा केली. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके, पोलीस निरीक्षक राहुल काटवाणी, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे व कर्मचारी आदींनी शुभेच्छा दिल्या.

## मुस्लिम बांधवांना ईदीच्या शुभेच्छा

**| रसायनी | प्रतिनिधी |**

तुपगाव चौक येथे रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शनिवारी सकाळी चौक व परिसरातील मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केल्यानंतर एकमेकांना ईद मुबारक शुभेच्छा दिल्या. तसेच, खालापूर पोनि सचिन पवार, सपोनी मनीष मोरे, पोउपनि नितीन सांगळे, चौक प्रभारी विशाल पवार, पत्रकार अर्जुन कदम व अन्य कार्यकर्त्यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

## पोलिसांकडून गुलाब देत शुभेच्छा

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**


(छायाचित्रः धम्मशील सावंत

पवित्र रमजान महिन्याची सांगता आणि ईद-उल-फित्रनिमित्त शनिवारी (दि.२१) तालुक्यात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या आनंदाच्या क्षणी सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे दर्शन घडवत पालीचे पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी पाली येथील मस्जिदमध्ये जाऊन मुस्लिम बांधवांची भेट घेतली व ईदच्या शुभेच्छा दिल्या. पोलीस निरीक्षक शेरेकर यांनी, पाली नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर यांना गुलाब देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मस्जिदीत उपस्थित असलेल्या इतर मुस्लिम बांधवांनाही त्यांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. सण-उत्सव हे समाजाला जोडण्याचे काम करतात. अशा प्रसंगी एकमेकांच्या आनंदात सहभागी झाल्याने सामाजिक ऐक्य अधिक मजबूत होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



## पेणमध्ये ईदीचा उत्साह

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण वरच्या मोहल्ल्यात व खालच्या कसाई मोहल्यात ईदीची नमाज पठण केली. सकाळी ८.०० वाजताच्या सुमारास वरच्या मोहल्ल्यात नमाज झाली. तर, कसाई मोहल्ल्यात साडेआठ वाजता नमाज पठण झाली. त्यानंतर सर्व मुस्लिम बांधवांनी एकमेकांना भेटून शुभेच्छा दिल्या. पेण पोलीस ठाणे आणि पेण शांतता कमिटी मार्फत मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी उपविभागीय पोनरस अधिकारी जालिंदर नालकुद, पोनि संदीप बागुल, शांतता कमिटीचे सदस्य आमोल घोटणे, नगरसेवक कृष्णा भोईर व मा. नगरसेवक संतोष पाटील हे उपस्थित होते.

**गळाभेट घेत दिल्या शुभेच्छा | ईद सण उत्साहात साजरा**

# बेणसेत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**


(छायाचित्र:धम्मशील सावंत)

रायगड जिल्ह्यातील बेणसे येथील जामा मस्जिद मध्ये शनिवारी (दि.२१) सकाळी मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करून ईद सण उत्साहात साजरा केला. यावेळी मुस्लिम बांधवांची नमाज अदा करण्यासाठी गर्दी झाली होती. यावेळी बेणसेत रमजान ईदनिमित्त हिंदू मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन घडले. येथील मस्जिदमध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध, व सर्व धर्मीय बांधवांनी एकत्रित येत शांतता पूर्ण व एकोपा जोपासत ईदचा आनंद द्विगुणित केला. मुस्लिम बांधवांमध्ये देखील प्रचंड उत्साह पहावयास मिळाला. यावेळी पांढरे शुभ्र कपडे परिधान करून एकमेकांना शुभेच्छा देताना आपलेपण व जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण झाले होते.

पवित्र रमजान सुरू असताना मुस्लिम समाजातील लहान मुले, तरुण व मुस्लिम बांधवांनी रोजे धरले होते. ईदनिमित्त त्यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून प्रसन्न मनाने नमाज पठण केले. बेणसे झोतीर पाडा विभागात गेले कित्येक वर्षांपासून हिंदू, मुस्लिम व बौद्ध बांधव अतिशय गुण्या गोविंदयाने नांदतात. एकमेकांच्या सण व उत्साहात आनंदाने सहभागी होतात. येथील सर्वधर्मीय एकोपा व सामाजिक सलोखा संपूर्ण जिल्ह्याला आदर्शवत ठरावा असाच आहे. त्यामुळे बेणसे येथील ईदच्या सणाला सारेच जण आवर्जून उपस्थित राहतात. मुस्लिम बांधवांकडून यावेळी मिळणारे प्रेम व जिव्हाळा सर्वांना गहिवरून टाकणारा होता. खऱ्या अर्थाने रायगड जिल्ह्यात सर्वत्रच रमजान ईदचा सण उत्साही वातावरणात व धुमधडाक्यात साजरा झाल्याचे पहावयास मिळते.

यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त देखील ठेवण्यात आला होता. यावेळी अध्यक्ष अजीम बेनसेकर यांनी मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



# निवडक

## बोरगाव शाळेसाठी सोलर पॅनल

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्या रोटरी क्लब देवनार यांच्याकडून बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेसाठी सोलर पॅनल भेट दिले. या सोलर पॅनलमुळे शाळेतील विजेचा प्रश्न निकाली निघणार आहे. तर, शाळेत पावसाळ्यात पाण्याचे नियोजन करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम देखील भरत देण्यात आली. रोटरी क्लब ऑफ देवनार तर्फे बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत सोलर पैनल सिस्टीम व रेन वॉटर हार्वेस्टिंग भेट देण्यात आले. बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमाला ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोलर पॅनलचे अनावरण रोटरी क्लब ऑफ देवनारच्या अध्यक्षा अलका मुरली यांचे हस्ते झाले. यावेळी रोटरीयन कन्नन, इलेक्टेड अध्यक्षा नलिनी कन्नन, रोटरीयन आजित पप्पू, मुरेंद्रनाथ, कर्जत तालुका समन्वयक अर्जुन तरे, शेटकरी ग्रामीण मंडळ दत्तात्रय पाटील, भरत खांडेकर, अरुण मसणे, प्रकाश सोनावडे, सिताराम बदे, भरत खेडेकर, मारती बागडे देशमुख व मानिवली येथील हुतात्मा स्मारक समितीचे सर्व सदस्य, जितेंद्र गतर्फ व लहू डायरे आदी आवर्जुन उपस्थित होते.



## तोंडरेतील पूरस्थितीवर संयुक्त बैठक



**पनेवल** : तोंडरे गावात पावसाळ्यात विविध कारखान्यांमधून येणाऱ्या पाण्यामुळे दरवर्षी पूरसदृश परिस्थिती निर्माण होत असल्याच्या तक्रारींवर संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या समस्येबाबत संबंधित कारखाने तसेच प्रशासनाला यापूर्वी लेखी पत्र देण्यात आले होते. बैठकीदरम्यान ग्रामस्थांच्या अडचणींची सविस्तर मांडणी करण्यात आली. अधिकाऱ्यांनी या समस्येची गांभीर्याने दखल घेत लवकरात लवकर उपाययोजना करण्यात येईल, असे आश्वासन दिले. पावसाचे पाणी योग्य मार्गाने वाहून जाण्यासाठी नालेसफाई व पाणी व्यवस्थापनाबाबत उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. यावेळी नगरसेवक राम पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, तसेच नगरसेवक प्रकाश म्हात्रे उपस्थित होते. गावकऱ्यांनी लवकरात लवकर ठोस उपाययोजना करून पूरस्थिती टाळावी, अशी मागणी केली आहे.

## ३२ रक्तदात्यांनी केल रक्तदान



**नेरळ** : कर्जत तालुक्यातील अवसरे येथील हिंदू नववर्ष दिनाच्या निमित्ताने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ३२ रक्तदात्यांनी रक्तदानाचे पवित्र कार्य केले. ग्रामस्थ मंडळ अवसरे आणि जय भवानी तरुण मंडळ यांच्यावतीने नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सार्वजनिक रक्तदाते राजेश कोठारी यांच्या माध्यमातून रक्त संक्रमण करण्यासाठी बदलापूर येथील माया ब्लड बँक यांनी रक्त दानाची प्रक्रिया पूर्ण केली. या वेळी ग्रामस्थ मंडळाच्या आवाहनानुसार ३२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## ‘मला भावलेली व्यक्तिमत्वे’ प्रकाशन

**चिरनेर** : ज्येष्ठ साहित्यिक ए.डी. पाटील यांच्या लेखणीतून उतरलेल्या ‘मला भावलेली व्यक्तिमत्वे’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उरण तालुक्यातील पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात रविवारी (दि.२२) सकाळी साडेदहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पुस्तकाचे प्रकाशन साहित्यिक ए.डी. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षस्थान त्रिदल एज्युकेशन सोसायटी व कल्याणच्या सुदर्शन एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. सुरेश पाटील भूषविणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिका स्मिता वाजेकर या कार्यक्रमातील प्रमुख वक्त्या असून, त्या या पुस्तकाचे परीक्षण करणार आहेत, अशी माहिती लेखक ए.डी. पाटील यांनी दिली.

# पोस्ट ऑफिस शहरात हलविण्याची मागणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

**उरण शहरातील पोस्ट ऑफीस हे जेएनपीए वसाहतीमध्ये हलविण्यात आल्याने उरण शहरासह मोरा, नागाव, म्हातवली, केगाव, कोटनाका, काळाधोंडा, मुळेखंड व चाणजे परिसरातील नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यात पोस्ट ऑफीसमध्ये ये-जा करणाऱ्या नागरिकांना वेळेसह आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी लोकप्रतिनिधींनी पोस्ट ऑफीस पुन्हा उरण शहरात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.**





पोस्ट ऑफीस हे केवळ पत्रे पाठवण्याचे साधन राहिले नसून, ते ग्रामीण व दुर्गम भागात सरकारी सेवा पुरवणारे, १०० टक्के सुरक्षित बचत व गुंतवणूक योजना देणारे आणि आर्थिक साक्षरतेचे प्रमुख केंद्र बनले आहे. हे कमी गुंतवणुकीत अधिक परतावा, जीवन विमा आणि टपाल सेवांच्या माध्यमातून लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. परंतु, उरण शहरासह परिसरातील नागरिकांना शहरातील पोस्ट ऑफिस इतरत्र हलविल्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. उरणमधील पोस्ट ऑफीसची इमारत धोकादायक झाल्यामुळे ते वर्षभरापूर्वी जेएनपीए बंदर वसाहतीमध्ये हलविण्यात आले होते. हे ठिकाण उरण शहरापासून साधारण ४ ते ५ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे उरण शहर, मोरा, नागाव, म्हातवली, केगाव, कोटनाका, काळाधोंडा, मुळेखंड व चाणजे परिसरातील अबालवृद्ध नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यात पोस्ट ऑफीस मध्ये ये-जा करणाऱ्या नागरिकांचा वेळ व पैसा वाया जात असून शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषद सदस्य, उरण पंचायत समितीचे सभापती, सदस्य व नगराध्यक्षा यांनी जेएनपीए बंदर वसाहतीमध्ये हलविण्यात आलेले पोस्ट ऑफीस पुन्हा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

■ **अबालवृद्धांची होतेय वानवा**

■ **वेळेसह आर्थिक भुर्दंड**

> **उरण शहरातील पोस्ट ऑफीस हे जेएनपीए वसाहतीमध्ये हलविण्यात आल्याने नाहक आम्हा नागरिकांना उन्ह, पाऊस सहन करत तसेच आर्थिक भुर्दंड सोसत जेएनपीए वसाहतीमध्ये जावे लागत आहे.तरी लोकप्रतिनिधींनी उरण शहरातील पोस्ट ऑफीस पुन्हा एकदा उरण शहरात आणण्यासाठी पुढाकार घ्यावा**
> **– पुष्पलता पाटील जेष्ठ महिला**

## जागतिक वन दिवस उत्साहात

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे जागतिक वन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने हा वन दिवस कार्यक्रम पार पडला. यावेळी रोहा परिमंडळ वन अधिकारी व्हि.बी.जाधव, महाराष्ट्र राज्य वन विभागाचे सोमनाथ चव्हाण, वन मजूर सुरेश वाघमारे, गोपीनाथ वाघमारे, मुख्याध्यापक दिपक जगताप, सहा. शिक्षक सुनील थिटे, शशिकांत महाडिक, चंद्रशेखर कांबळे व हरित सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम लागवड करण्यात आलेल्या वृक्षांच्या रोपांसमोर दीपप्रज्वलन करून पूजन करण्यात आले व रोपांना पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर ‘झाडे लावा, झाडे जगवा’, तसेच ‘वसुंधरा वाचवा’ याबाबत संदेश देणारे वसुंधरा गीत गाऊन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आस्था थिटे आणि दिशा हळदे यांनी वन दिवसाचे महत्त्व व वृक्षारोपण ही काळाची गरज याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. तर, वन विभागाचे अधिकारी सोमनाथ चव्हाण यांनीही पर्यावरण संवर्धन व संरक्षण तसेच मार्गदर्शन केले.

## चिरनेरला राम नवमीचा उत्सव

**चिरनेर** : उरण तालुक्यातील चिरनेर मधीलपाडा-तेलीपाडा येथे रामनवमी जन्मोत्सव दि.२५ ते २७ मार्च या कालावधी दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. त्यामध्ये हरिपाठ व कीर्तनाचा कार्यक्रम होईल. काकड आरतीसह प्रभू रामचंद्रांचा अभिषेक सोहळा होईल. भजने सादर होतील. तसेच, प्रभू रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात येईल. त्याचबरोबर राम रामनवमी उत्सवानिमित्ताने मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती चिरनेर मधीलपाडा तेलीपाडा ग्रामस्थांच्यावतीने देण्यात आली.

## आरोग्य केंद्रात अनेक पदे रिक्त

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी अंतर्गत एकूण ६ उपकेंद्रे आहेत. त्यातील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा मोठा ताण पडत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी अंतर्गत असलेल्या ६ उपकेंद्रापैकी कुडली, सुतारवाडी व घाटाव याठिकाणी प्रत्येकी एक-एक आरोग्य सेविकांची पदे रिक्त आहेत. तसेच, सुतारवाडी, तळवळी, संभे व घाटाव या ठिकाणी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे पद रिक्त आहेत. तर पहूर, देवकाने, भुवनेश्वर ही उपकेंद्र नव्याने बांधण्यात आलेली आहेत. या ठिकाणी आरोग्य सेवक व आरोग्य सेविका ही दोन्ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा मोठा ताण पडत आहे. सुतारवाडी येथे पूर्वी पूर्णवेळ परिचारिका कार्यरत होती; मात्र, काही दिवसांपूर्वी तिची इतरत्र बदली झाल्यामुळे तेथे परिचारिकेची जागा रिक्त आहे. या उपकेंद्रामध्ये प्रस्तुतीसाठी अनेक ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर स्त्रिया, आदिवासी भगिनी येत असतात. तसेच, विविध प्रकारचे डोस, अनेक योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्याचे काम येथील कर्मचारी करत आहेत.



(छायाचित्र: हरिश्चंद्र महाडिक)

## रामनवमीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**। वावे । प्रतिनिधी ।**



अलिबाग तालुक्यातील वावे येथे गुरुवारी (दि.२६) श्रीरामजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.०० वाजता सुश्राव्य भजनांचे कार्यक्रम होणार आहेत. त्यांनतर श्रीरामप्रभुंच्या जन्मसोहळ्याचे पोथीवाचन सकाळी १०.०० वाजता होणार आहे. श्रीरामनवमीच्या दिवशी दुपारी साडेबारा वाजता श्रीरामप्रभुंचा जन्मोत्सवाचा सोहळा संपन्न होणार आहे. भक्तजनांच्या मनोजनार्थ बेलोशी, महाजने, आंदोशी, उसर, वळवली, आंबेपूर या सहा भजनी मंडळांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली आहे. त्यानंतर रात्री ९.०० वाजता श्रीरामरथ चलचित्र पालखी सोहळा पार पडणार आहे. यावेळी वेषभुषाधारक भाविक ग्रामस्थ हे श्रीरामप्रभूंच्या पालखीचे प्रमुख आकर्षण असणार आहे. श्रीरामप्रभूंच्या पालखीसोहळ्यात गुलालाची चौफेर उधळण करून ग्रामस्थ आपला आनंद साजरा करतात. तसेच, जय हनुमान लाठीकाठी आखाडा भोनंग यांचे, लाठी-काठी व मल्लखांब अशा मैदानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके मंदिराच्या प्रांगणात दाखविण्यात येणार आहेत. या सोहळ्याचा आनंद आपण सर्वांपर द्विगुणीत करावा, असे आवाहन वावे ग्रामस्थांच्यावतीने दिनेश तुरे यांनी केले आहे. तसेच, नाट्यरसिकांच्या मनोरंजनार्थ शनिवारी (दि.२८) रात्री १०.०० वाजता ‘दिल्या घरी सुखी रहा’ या दोन अंकी सामाजिक व कौटुंबिक नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे.

## रामवाडीत श्रीराम जन्मोत्सव सोहळा

**पाली/गोमाशी** : रामवाडी ग्रामस्थ मंडळ व श्रीराम सेवा सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अमृत महोत्सवी श्रीराम नवमी उत्सव दि.२६ मार्च रोजी साजरा करण्यात येत आहे. या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित्त दि.२३ ते २५ मार्च रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२६ मार्च रोजी श्री रामनवमी निमित्त काकडा भूपाळी, अभ्यंगस्नान, अभिषेक, श्री रामरक्षा स्तोत्र वाचन, सकाळी साडेदहा वाजता जन्मोत्सव कीर्तन, त्यानंतर महाप्रसाद, सुस्वर भजन, महिलांसाठी हळदी कुंकू, पालखी मिरवणूक, सत्कार समारंभ, विविध गुणदर्शन स्पर्धा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## कष्टकरी नगर येथे विविध कार्यक्रम



**। आपटा । प्रतिनिधी ।**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कष्टकरी नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांसाठी मनोरंजनाचे खेळ तसेच जागतिक महिला दिनाचे महत्त्व, आर्थिक बचत कसे करावे याबद्दलची माहिती देण्यात आली. यावेळी युवा संस्थेच्या रेश्मा निलंगे व विद्या रामगुडे यांनी महिलांचे हक्क जबाबदारी आणि मनोरंजनात्मक खेळ याबद्दल महिलांना माहिती देऊन विशेष सहकार्य केले. आपणच आपल्या घरात मुलगी आणि मुलगा यांना समान वागणूक देतो का? असा प्रश्न देखील केला. त्यामुळे प्रत्येक महिलांनी आपण स्वतः हा भेदभाव करणे थांबवले पाहिजे, याची जाणीव करून दिली. तसेच, या कार्यक्रमासाठी आपले एक सामाजिक जबाबदारी व आपले कर्तव्य समजून आई फाऊंडेशनचे संस्थापक राजे बाबुराव खैरे व सदस्य मनोज न्याहार यांच्यावतीने १८० किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप केले. त्यामुळे येथील महिलांमध्ये समाधान व्यक्त केले जात होते.

## हुनरवेलीमध्ये श्रीराम मंदिराची प्राणप्रतिष्ठा

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील हुनरवेली येथे ग्रामस्थांच्या एकजुटीतून श्रीराम मंदीर उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या उद्घाटन व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन श्रीराम नवमी दिनाचे औचित्य साधून दि.२४ ते २६ मार्च दरम्यान करण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या सामूहिक सहभागातून उभारलेले हे मंदिर गावाच्या एकात्मतेचे प्रतीक मानले जात आहे. सोहळ्याच्या निमित्ताने विविध धार्मिक विधी, पूजाअर्चा, भजन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. मंगळवारी (दि.२४) सायंकाळी ५.०० वाजल्यापासून प्राणप्रतिष्ठा या धार्मिक विधींनी कार्यक्रमांची सुरुवात होणार आहे. बुधवारी (दि.२५) सकाळी ९.०० वाजता मूर्ती स्थापना व कलशारोहण, तर, दुपारी ३.०० वाजता उद्घाटन व उपस्थित मान्यवरांचा सत्कार समारंभ होणार आहे. रात्री १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. गुरुवारी (दि.२६) या सोहळ्याचा मुख्य दिवस असून सकाळी १०.०० वाजता महापूजा पार पडणार आहे. याच दिवशी दुपारी ३.३० वाजता श्रीराम पालखी मिरवणूक संपूर्ण गावातून काढण्यात येणार आहे.

## चवदार तळ्याच्या आंदोलनातून समतेचा संदेश

**● हर्षवर्धन सपकाळ यांचे प्रतिपादन**

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाड येथे चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्षे सोहळ्याचे औचित्य साधून, शुक्रवारी (दि.२०) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी, चवदार तळ्याच्या आंदोलनात बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत अनेकांचा सहभाग होता. त्या आंदोलनातून समतेचा संदेश देण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य निर्माण केले. तेव्हा समता, बंधुता, न्याय यांची खऱ्या अर्थाने पायाभरणी केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी तोच वसा पुढे नेला. त्यातूनच पुढे संविधानाची निर्मिती झाली. आज सर्वधर्मसमभावाच्या विचारानेच काग्रेसची वाटचाल सुरू आहे. चवदार तळ्याच्या पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यातून माणसाने माणसाशी कसे वागावे, हा संदेश मिळतो, असे सांगितले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी, बाबासाहेब आंबेडकर हे सर्वधर्मीयांचे अनुयायी होते. आजचा काळ फार कठीण आहे. आजच्या सत्ताधीशांची सत्तेसाठी जी तंत्रे वापरली आहेत. त्यात पोटात भूक आणि डोक्यात भीती, जातीभेद याचा अवलंब केला आहे. आजच्या सत्ताधीशांचा खोटे बोलण्यात कुणी हात धरू शकत नाही. ते प्रचंड भ्रष्टाचारी आहेत, असे त्या म्हणाल्या. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत, सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी, उल्का महाजन, सिद्धार्थ हत्तीअंबिरे आदी उपस्थित होते.

**नेरळ-माथेरान दरम्यान केवळ दोनच गाड्या सुरू** | **तिकिटाअभावी पर्यटकांचा हिरमोड**

# मिनीट्रेनची संख्या वाढविण्याची मागणी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये पर्यटकनासाठी तसेच खासकरून मिनिट्रेनच्या सफारीसाठीच पर्यटक आपल्या लवाजम्यासह येत असतात. परंतु, नेरळ-माथेरान दरम्यान केवळ दोनच गाड्या सुरू असून एका बोगीत तीस आसनव्यवस्था असते. त्यामुळे ऐन सुट्टीच्या हंगामात तिकिटाअभावी खासगी वाहनांचा आधार घेऊन पर्यटकांना माथेरान गाठावे लागते. दरवेळी रेल्वे प्रशासनाकडून या मार्गावर खडी टाकणे, स्लीपर्स बदलणे, रेल्वे स्थानकावरील दुरुस्ती त्याचप्रमाणे अन्य कामे सुरू असतात. त्यासाठी आजवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे ठेकेदार मालामाल होत आहेत. परंतु, नेरळ ते माथेरान दरम्यान मिनिट्रेनच्या फेऱ्या वाढविल्या जात नाहीत.



अमन लॉज ते माथेरान स्टेशन या मार्गावर मिनिट्रेनची शटल सेवा बाराही महिने सुरू असल्यामुळे पर्यटकांना या दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर या गाडीत बसण्याचा आनंद घेता येत आहे. या शटलला घाट सेक्शन नसताना देखील पुढे मागे दोन इंजिन्स लावण्यात येतात. तर, नेरळहुन येणाऱ्या तीव्र चढावावर फक्त एका इंजिनच्या साहाय्याने पाच बोग्यांची गाडी चालवली जाते. याच शटलमधील प्रत्येकी एक इंजिन नेरळ-माथेरान मार्गासाठी वापरण्यात आल्यास या मार्गावर ट्रेनच्या फेऱ्या वाढू शकतात. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना डोंगर दर्यांच्या सान्निध्यात प्रवास करताना गाडी संपूर्ण डोंगराला वळसा घालून खोल दरीच्या वरून जात असताना एक वेगळीच मजा, आनंद मिळू शकतो. संबंधित अधिकारी वर्गाने याबाबत गांभीर्याने लक्ष केंद्रित करून पर्यटकांना या झुकझुक गाडीचा मनमुराद आनंद मिळावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे पर्यटकांमधून बोलले जात आहे.

> **आम्ही जानेवारी महिन्यात शनिवारी सकाळी नेरळ स्थानकावर आलो असता गाडी फुल्ल झाल्याने आम्हाला तिकीट उपलब्ध झाले नाही. दोनच ट्रेन असल्याने पुढची ट्रेन दोन तासांनी होती. एवढा वेळ मुलांना घेऊन ताटकळत बसण्याशिवाय पर्याय नव्हता. निदान चार ट्रेन या मार्गावर सुरू केल्यास सर्वांना या ट्रेनमध्ये बसण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते.**
> **– सिद्धांत पाठक, पर्यटक, मुंबई**

**मिनिट्रेन फेऱ्या**

**नेरळ ते माथेरान**
**सकाळी ८.५० आणि १०.२५**
**माथेरान ते नेरळ**
**दुपारी २.४५ आणि संध्याकाळी ४.००**

**शटल ट्रेन वेळापत्रक**

**माथेरान ते अमन लॉज स्टेशन**
**सकाळी ८.२०, ९.१०, १०.०५ व ११.३५**
**दुपारी १.१०,२.००, ३.१५, ५.२०**
**अमन लॉज ते माथेरान स्टेशन**
**सकाळी ८.४५, ९.३५, १०.३०, १२.००**
**दुपारी १.३५, २.२५, ३.४०, ५.४५**

## हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार

**चिरनेर** : उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धाराचे भूमिपूजन शनिवारी (दि.२१) चिर्ले येथील सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. चिरनेर गणपती देवस्थानातील हे कौलारू हनुमान मंदिर जीर्ण झाले होते. या मंदिरातील श्री हनुमानाची मूर्ती ही भव्य पाषाणी व पुरातन आहे. गणपती तीर्थस्थानातील हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा, हे ग्रामस्थांबरोबर भक्तगणांना वाटत होते. दरम्यान, समीर पाटील यांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी गणपती देवस्थानच्या पदाधिकारी व ग्रामस्थांबरोबर संपर्क साधला आणि स्वखर्चातून मंदीरासह समोरील सभामंडप उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

# बीएसएनएल मोबाईल नेटवर्क सेवा ठप्प

## ●ऑनलाईन काम करण्यांना अनेक समस्या ● ग्राहकांमध्ये नाराजीची सूर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

**मुरुड शहरातील बीएसएनएल मोबाईल नेटवर्कची सेवा गेले आठ दिवसांपासून सेवा ठप्प झाल्याने ग्राहक अक्षरक्ष हैराण झाला आसुन कोण वायफाय देता का वायफाय अशी विचारणा ग्राहकांकडून होत आहे.**

मुरुड हरिजन वाडा जवळील बीएसएनएलचे कार्यालया असून यांच कार्यालयांमधुन बीएसएनएलची सेवा दिली जाते. मोबाईल नेटवर्क करिता दत्तमंदिराजवळ बीएसएनएलचे टॉवर आहे. या टॉवरवरुन मुरुडच्या मोबाईलधारकांना या रेंजचा फायदा होत असतो. परंतु हा टावर गेले आठ दिवसांपासून नेटवर्क डाटा सेवा ठप्प झाल्याने मोबाईल नेटवर्क सेवा पुर्णतःबंद पडली आहे.


(छाया: गणेश चोडणेकर)

शहरात मोबाईल नेटवर्क करिता अनेक खासगी कंपन्यांचा नेटवर्क फुल असून ते चांगली सेवा देत आहे. परंतु बीएसएनएलची मोबाईल नेटवर्क सेवा कधीही ठप्प होते हे आता दररोजचे झाले आहे.

गेले आठ दिवस नेटवर्क डाटा अभावी गावातील व शहरातील विद्यार्थी, नोकरदार, ऑनलाईन काम करण्याची गैर सोय होत आहे. कामाकरिता कोणी वायफाय देता का वायफाय सध्या बीएसएनएलची धारकांची ही परिस्थिती आहे.

बीएसएनएलच्या अधिकारी प्रमोद पाटील यांना मोबाईल नेटवर्क डाटा चालत नसल्यामुळे ऑनलाईन प्रक्रियाला अडथळा येत आहे. या संदर्भात फोन व्दारे तक्रार केली. परंतु आज आठ दिवस झाले तरी अधिकाऱ्यांकडून या समस्या बाबत गांभीर्याने घेताना दिसत नाही. रेंज आज होईल उद्या होईल हेच उत्तर मिळत आहे. परंतू नेटवर्कचा डाटा मिळत नाही. मोबाईल नेटवर्क सुरळीत होताना दिसत नाही. ग्राहक अक्षरक्ष हैराण झाले आहेत.



# इसांबेत बोलक्या भिंती प्रकल्प

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

बिर्ला कार्बन इंडिया प्राइवेट लिमिटेड पातळगंगा यांच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळा इसांबे येथे बोलक्या भिंती प्रकल्प व शाळा सुशोभीकरण उद्घाटन समारंभ पार पडला. कार्यक्रमास रवींद्र रघुवंशी, निखिल भामरे उपस्थित होते. बिर्ला कार्बन पाताळगंगा कंपनीमार्फत खालापूर तालुक्यातील ५० पेक्षा जास्त प्राथमिक शाळांमध्ये बोलक्या भिंती हा अनोखा उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे शाळेचा संपूर्ण कायापालट होताना दिसत आहे व विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये वेगळे चैतन्य पहावयास मिळत आहे. सदर कार्यक्रमासाठी संतोष बैलमारे, गौरी गडगे, राजिप प्राथमिक शिक्षण विभाग उपशिक्षणाधिकारी सुनील भो-पळे, दीपा परब गटशिक्षणाधिकारी खालापूर जे. पी. परदेशी, किशोर परदेशी, नंदा मोहिते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अंजली परदेशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व ग्रामपंचायत सदस्य सरपंच उपसरपंच तसेच ग्रामसेवकांचे सहकार्य लाभले.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ मार्च

१)श्रीम.प्रमोदिनी गोपीनाथ पाटील
अलिबाग, २२-३-१९४४

२)श्री.शाम गोपीनाथ आंबवणे
आपटा, अलिबाग २२-३-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हारुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व. विजयाबेन खिमजी जैन, स्मरणार्थ अलिबाग**



**तेजराजजी हिमतमलजी नानेशा, पुण्यतिथी अलिबाग**

**कै. राधाबाई कृष्णाजी पराडकर, स्मरणार्थ, अलिबाग**

---

## रिक्षा चालकाकडून गांजा हस्तगत

**पनवेल :** शहर पोलिसांनी सोसायटी नाका ब्रिजच्या खाली टाकलेल्या छाप्यात हजारो रुपये किमतीचा गांजा हा अमली पदार्थ हस्तगत केला असून या प्रकरणी एका इसमास ताब्यात घेतले आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शाकिर पटेल, प्रवीण फडतरे, सुनील वाघ, पो उपनिरीक्षक देवकाते, नामदेव पडळकर आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपी हिमानल्लू सोमनाथ गंठेपागू या रिक्षा चालकाकडे ताबेकब्जात ४१६ ग्रॅम वजनाचा एकुण अंदाजे २१,००० रू. किंमतीचा मगांजाफ हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःचे कब्जात बेकायदेशिररित्या बाळगले स्थितीत असताना मिळुन आला म्हणुन त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

# चिमुरड्यांनी गिरवले व्यवहाराचे धडे

**। उरण । प्रतिनिधी ।**

राजिपच्या आदर्श केंद्र शाळा चिरनेर येथे बाल आनंद मेळावा आणि खाद्य जत्रा अत्यंत उत्साहात संपन्न झाली. पुस्तकी ज्ञानाला व्यावहारिक जोड देत विद्यार्थ्यांनी स्वतः विविध पदार्थांचे स्टॉल्स मांडून आपल्यातील भावी उद्योजकाची झलक दाखवून दिली. या मेळाव्यात एकूण १९५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत ग्रामस्थांची मने जिंकली. चिरनेर केंद्राचे केंद्रप्रमुख दर्शन पाटील, शाळा समितीचे अध्यक्ष सचिन म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी भारती ठाकूर, बापू मोकल, निलेश ठाकूर, संग्राम ठाकूर, बी. जे . म्हात्रे, प्रफुल्ल खारपाटील, संजय पाटील, अरुण ठाकूर, समाधान म्हात्रे, अशोक कांबळे, हिम्मत केणी, दामोदर केणी, प्रवीण म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्य आणि सदस्या, शिक्षकवृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी लावलेल्या ६० स्टॉल्सवर मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली होती. यावर स्टॉल्स प्रमुख आकर्षण: चिकन बिर्याणी, उकडीचे मोदक, पाव भाजी, चिकन पकोडा, समोसा, दूध मलाई, इडली, पॉपकॉर्न आणि फ्रेंच फ्राईज,गोड व थंड पदार्थ: कप केक, फ्रुट मेजवानी, गुलाबजाम, फ्रुटी मिल्कशेक, आणि गाजर हलवा, पौष्टिक आहार: यासोबतच मेळाव्यात परिसरातील ताज्या पालेभाज्यांचे स्टॉल्स लावून पौष्टिक आहाराचा संदेश देण्यात आला. यावेळी निर्भय म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## अजगरास जीवदान

**चिरनेर :** उरण न्यायालय नजिकच्या भंगार गोदामात १० फूट लांबीचा अजगर आढळून आला असताना, या अजगराला सर्पमित्रांकडून शिताफिने पकडून त्याला जंगल अधिवासात सोडून जीवनदान देण्यात आले आहे. हा साप इंडियन रॉक पायथन म्हणजेच भारतीय अजगर जातीचा असून सुमारे दहा फूट लांबीचा आणि साधारणतः ३० किलो वजनाचा असल्याची माहिती सर्पमित्रांनी दिली. सध्या तापमानात प्रचंड वाढ झाली असून, विकासाच्या नावाखाली येथील जंगलातील प्राण्यांचे आधिवास नष्ट होत चालले आहे. त्यामुळे जंगली प्राणी, पशुपक्षी, सरपटणारे प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.



# ‘शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरण आवश्यक’




**। कर्जत । प्रतिनिधी ।**

मजुरांची कमतरता आणि मजुरीचे वाढते दर लक्षात घेता शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरणाची कास धरणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. यू. शहारे यांनी केले. आदिवासी उप योजना, अखिल भारतीय समन्वित बियाणे योजनेंतर्गत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथी गृह सभागृहात आयोजित भात पीक बीजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होते. व्यासपीठावर सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने, तालुका कृषी अधिकारी आर. ए. शिंदे उपस्थित होते.

डॉ. शहारे यांनी भात लावणीपासून कापणीपर्यंत लागणाऱ्या विविध यंत्रांची माहिती देत अल्प खर्चाची, कमी कष्टाची व फायदेशीर शेतीसाठी यांत्रिकीकरणाचे विविध पैलू समजावून सांगितले. तर डॉ. वाघमोडे यांनी जमिनीच्या प्रकारानुसार भात जाती कशा निवडाव्यात, पोषणमूल्ये असलेल्या तसेच भाकरी, पोहे, मुरमुरे, जेवणाचा आस्वाद वाढविणाऱ्या वेगवेगळी गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जातींचा कसा वापर करावा, हे पटवून दिले. यावेळी आदिवासी उप योजनेंतर्गत शिलारवाडी, खरबाची वाडी, खोंडेवाडी व नागेवाडीच्या पाच गटाला मनुष्यचलित भात लावणी यंत्र, नॅपसॅक स्प्रे पंप, तसेच ५० शेतकऱ्यांना युरिया ब्रिकेट्स, वैभव विळे, घडीपत्रिकांचे वितरण डॉ. शहारे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, व आभारप्रदर्शन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले. यावेळी डॉ. महेंद्र गवई, डॉ. मीनाक्षी केळुस्कर, डॉ. देवदत्त जोंधळे, डॉ. वैशाली सावंत, डॉ. राजेंद्र सावळे यांनी मार्गदर्शन केले.

---

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २२ ते २८ मार्च २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## अहंकारापासून दूर राहा

**मेष :** राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता आपणास मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. कामाचा उत्साह वाढेल, मात्र कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. प्रकृती स्वास्थ्याबाबत खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. या सप्ताहात आपले ग्रहमान आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल, मात्र अहंकारापासून दूर राहा. अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष द्या. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. **महिलांना :** बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. आपण प्रकृती स्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. **शुभ दिनांक :** २३,२४.

## उधार-उसनवारी टाळा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा. किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. काही नवीन प्रस्ताव मिळतील. **महिलांना :** मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. **शुभ दिनांक :** २५,२६.

## प्रलोभनात अडकू नका

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, विशेषतः महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळेल. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्याल. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत व पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे य़ोग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. आपली शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या. तसेच ती कामे पार पाडण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तीचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक :** २७,२८.

## नेतृत्वाची संधी मिळेल

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे, पण बडेजाव मात्र टाळा. काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. हितशत्रूंवर नजर ठेवा. अचानक साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या, व भावी आयुष्याचा विचार करून वागा. सरकारी नियमांचे पालन करणे हिताचे राहील. सामाजिक कामाला प्राधान्य द्या त्याचे पडसाद आपल्यासाठी फायद्याचे असतील. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या सुरुवातीला कानावर चांगली बातमी येईल. **महिलांना :** मुलांचे प्रकृती स्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. **शुभ दिनांक :** २३,२४.

## पैसे उधार देऊ नका

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सर्वांशी बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्ट कचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. थोरा मोठ्यांच्या भेटी होण्याची शक्यता राहील. कोणालाही पैसे उधार देऊ नका. जमीन राहू नका. कामावर आपले काम हलके करण्यासाठी योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा. आपली जबाबदारी कमी करा. **महिलांना :** आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभ दिनांक :** २२, २८.

## व्यवहारात सावधानता बाळगा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र, सावधानता बाळगा. आपण आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल. घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. उधारी घेऊ नका देऊ नका. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक :** २३,२७.

## स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. **शुभ दिनांक :** २४,२६.

## साहसी कृत्ये करु नका

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळावीत नाहीतर संकटात पडू शकता. मुलांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. व्यापाराला चालना मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, शेतीत लाभ होईल. **महिलांना :** आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक :** २५,२७.

## आर्थिक बाजू ठीक राहील

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपण दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका. आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. आपण सर्वांशी प्रेमाने वागल्यास हीच मंडळी आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतील. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल तरीही जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाकार मंडळीना कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळेल. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक :** २३.२६.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**मकर :** हा साप्ताह मकर राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. प्रकृतीची काळजी घ्या, आर्थिक बाजू ठीक राहील. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा ‘इगो’ दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. जागरण टाळा. सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. चुकीच्या पैशाचा मोह करू नका. सरकारी देणी त्वरित भरा. भक्तिमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. **महिलांना :** आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधी देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा ही ठरवा बाकी सर्व सोप होईल. **शुभ दिनांक :** २४,२७.

## गैरसमज होऊ देऊ नका

**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण शनी पर्वातून प्रवास करीत आहात हे विसरू नका. प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा, जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. **महिलांना :** सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागे पर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्या. **शुभ दिनांक :** २५,२८.

## अपेक्षित गोष्टी साध्य होतील

**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागा. महिन्याच्या सुरुवातीला कानावर चांगली बातमी येईल. शनी महाराज आपल्या राशिस्थानी आहे हे विसरू नका. नोकरदारांना दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. अपेक्षित गोष्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील, गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल, मनातील वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. **शुभ दिनांक-** २१,२३.

# लिफ्टच्या सुविधेमुळे दिव्यांगांना दिलासा

| नेरळ | वार्ताहर |



माथेरान पर्यटनस्थळाकडे जाण्यासाठी महत्त्वाचा मार्ग असलेल्या नेरळ रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी आणखी एक सुविधा उपलब्ध झाली आहे. मध्य रेल्वेच्या वतीने फलाट क्रमांक १ वरील नव्याने उभारण्यात आलेल्या लिफ्टचे उद्घाटन स्टेशन प्रबंधक गुरुनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर ही लिफ्ट प्रवासी वर्गासाठी खुली करण्यात आली आहे.

नेरळ रेल्वे स्थानक हे माथेरानकडे जाणाऱ्या पर्यटकांचे प्रमुख प्रवेशद्वार असल्याने दरवर्षी लाखो पर्यटक तसेच स्थानिक प्रवासी येथे ये-जा करतात. मध्य रेल्वेकडून या स्थानकावर अत्याधुनिक सुविधा उभारण्याचे काम सुरू असून काही काळापूर्वीच फलाट क्रमांक १ वर सरकता जिना (एस्केलेटर) सुरू करण्यात आला होता. आता त्याच ठिकाणी लिफ्टची सुविधा उपलब्ध झाल्याने प्रवाशांची मोठी सोय झाली आहे.

लिफ्टमुळे विशेषतः दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या पर्यटकांना फलाटावर ये-जा करताना मोठा दिलासा मिळणार आहे. जड सामान घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही याचा फायदा होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.

मध्य रेल्वेकडून नेरळ स्थानकावर प्रवाशांसाठी अधिकाधिक आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू असून या लिफ्टमुळे स्थानकाची प्रवासी सुविधा आणखी सक्षम झाल्याचे मत प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.


## सुबोध विद्यालयाची गरूडझेप

| खरोशी | प्रतिनिधी |




पेण शिक्षण महिला समितीचे श्रीमती सुमतीबाई वि. देव प्राथमिक विद्यालय, पेण येथील एम.टी.एस. (महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा) परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या विद्यालयातील इयत्ता दुसरीतील अनुश्री पाटील राज्यात अकरावी जिल्ह्यात पहिली, ईश्वरी यादव राज्यात सतरावी जिल्ह्यात तिसरी इयत्ता तिसरीत सान्वी पवार राज्यात दुसरी जिल्ह्यात पहिली, चिन्मय वारगुडे राज्यात दहावा जिल्ह्यात दुसरा, हार्दिक पाटील राज्यात चोवीसावा जिल्ह्यात चौथा, तर इयत्ता चौथीतील श्रीमयी बर्गे राज्यात दुसरी व जिल्ह्यात पहिली, कैवल्य उदार राज्यात नववा जिल्ह्यात दुसरा, लाभ कोठेकर राज्यात पंधरावा जिल्ह्यात तिसरा, अनुज पडळकर, राज्यात सोळावा जिल्ह्यात चौथा, स्वरूप ठाकूर राज्यात सतराव्या जिल्ह्यात पाचवा सातवीतील आदेश खेडकर(राज्यात दुसरा जिल्ह्यात पहिला असे क्रमांक पटकावून शाळेने आपले नाव जिल्ह्यात नावलौकिक केले असून संस्थाचालक, मुख्याध्यापिका सर्व शिक्षक व पालकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मुक्ताबाई मोकल यांचे निधन



**उरण :** महिला सामाजिक कार्यकर्त्या मुक्ताबाई लक्ष्मण मोकल यांचे (दि.१६)मार्च रोजी वयाच्या ७५ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार (दि.२५) रोजी माणकेश्वर उरण येथे सकाळी ८ वाजता तर उत्तर क्रिया विधी व होम विधी शुक्रवार (दि. २७) मार्च रोजी बोरखार येथे त्यांच्या राहत्या घरी होणार आहे. उत्तरकार्यानिमित्त कीर्तनकार कलावती शिवकर (केळवणे -पनवेल )यांचे (दि. २७) रोजी सकाळी ९:३० वाजता कीर्तन ठेवण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पाच नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **अलिबाग एस.टी. स्टँडजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **जागा विकणे आहे :** आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५
- **भारत पेट्रोल पंप चेंढरे** अलिबाग बायपास येथे कामासाठी मुले पाहिजेत व ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. शिक्षण B.Com ७४४७४०४४११/७४४७४०४४३८
- **सर्व प्रकारचे आजार लठ्ठपणा**/मधुमेह/संतानप्राप्ती/घरबसल्या लाखो कमविण्यासाठी (वेळ ठरवूनच) डॉ. नथुराम शिहू (नागोठणे-पोयनाड) रायगड ४०२१०६/७५०७१६६०१५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे जागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) इरफान अब्बास हुसेन २) शबनम इरफान हुसेन यांचेकडून विकत घेण्याची ठरविली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग जि.रायगड | १७१० | बागायत ०.०५.६०<br>पो.ख ०.००.२०<br>एकूण ०.०५.८० | १.३५ |

तसेच सदर मिळकतीमधील ग्रामपंचायत नागांव मिळकत क्र. ९४०

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक २१/०३/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे मौजे दहिवली तर्फे नीड, ता कर्जत, जि - रायगड येथील येथील शॉप मिळकत तीचा क्रमांक ०९ त्या मिळकतीचे मालक १ ) ऐहतेशाम ए पेनवाला, व क्रं २) रफत पेनवाला दोघे रा-मु-लाखरन, पोस्ट तिवरे, साई मार्बल समोर ता- कर्जत जि- रायगड पिन - ४१०२०१ यांची खालील वर्णन केलेली शॉप मिळकत तीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे दहिवली तर्फे नीड, ता कर्जत, जि -रायगड येथील सर्व्हे नंबर १६२/अ/१ प्लॉट नंबर १, क्षेत्र ९६७ चौ मीटर. २) सर्व्हे नंबर १६२/अ/२, प्लॉट नंबर २, क्षेत्र २३४० चौ मीटर. या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या पुजन पॅलेसीया या ईमारतीमधील तळ मजल्यावरील, ए विंग, शॉप नंबर ०९ क्षेत्र १४.३०० चौ मीटर कारपेट या मिळकतीचा

वर वर्णन केलेली शॉप मिळकत त्या मिळकतीचे मालक १) ऐहतेशाम ए पेनवाला, व क्रं २) रफत पेनवाला यांनी सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने आमचे आशिलास विकत देण्याचे ठरवलेले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र,चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक : २२/०३/२०२६

**ॲड भारत अंकुश सावंत**
(बी कॉम. एल. एल. बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे म्हात्रोळी गट नं.३२७ क्षेत्र ०-३७-५० आकार १०.११ या मिळकतीं संदर्भात श्रीमती योजना राम काठे, वगैरे यांचेविरूद्ध अलिबाग येथील अप्पर जिल्हाधिकारी, रायगड यांचे न्यायालयात हक्कनोंद अपील नं.८५/२०२६ चे अपील, उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेकडील हक्कनोंद अपील नं.२२/२०२५ मधील दिनांक ०८.०१.२०२६ रोजीच्या ओदशाविरूद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपिलाचे कामी स्थगितीचा आदेश करणेत आलेला आहे. सदर अपील अद्याप प्रलंबित आहे. अशी वस्तुस्थिती असताना श्रीमती योजना राम काठे, वगैरे हे त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करणेचा प्रयत्न करीत आहेत असे आमचे अशिलांस समजले आहे. ती बाब पूर्णतः चुकीची व बेकायदेशीर असून, त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. सबब श्रीमती योजना राम काठे, वगैरे अन्य कोणाबरोबरही हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास अशा वेळी संबंधिताविरूद्ध कडक कायदेशीर कारवाई करणेचा आमचे अशिलांना अधिकार राहील, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : २१.०३.२०२६

सही/-
**(ॲड.योगेश चंद्रकांत पार्टे)**
ए-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग-रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रविंद्र लक्ष्मण करमेळे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | १७३/१/७ | ०-४७-३०<br>पो.ख. ०-०७-७०<br>०-५५-०० | १०.९८ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २२/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धामणी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४२ | एकूण क्षेत्र १-३१-०० हे.आर | १.७५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पाच दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :- २२/०३/२०२६ **ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)
ज.म.र अर्ज ३९४/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार श्री. रियाज अहमद फारुखमिया घारे, रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड, जि. रायगड, यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदणी मिळणेकरीता अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा जन्म दि.०१/०६/१९६०, रोजी, राहत्या घरी मौजे मांडला, ता. मुरुड- जंजिरा, ता.मुरूड जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांस त्यांचे जन्मप्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदरहु नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद अभिलेखावर घेण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास या जाहिरनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्या तर सदरहु न्यायालय त्याला मागणीप्रमाणे जन्म दाखला देण्याचे आदेश देईल.

आज दिनांक १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)
ज.म.र अर्ज ४२९/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार श्री. माहेआलम फारूकमिया घारे रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड, जि. रायगड यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदणी मिळणेकरीता अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्री. माहेआलम फारूकमिया घारे यांचा जन्म दि. २८/०५/१९६३ रोजी राहत्या घरी मौजे मांडला, ता. मुरुड-जंजिरा, ता.मुरूड जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांस त्यांचे जन्मप्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदरहू नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद अभिलेखावर घेण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. तरी सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास या जाहिरनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्या तर सदरहु न्यायालय त्याला मागणीप्रमाणे जन्म दाखला देण्याचे आदेश देईल.

आज दिनांक १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)
ज.म.र अर्ज ४३०/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार श्री. मैताबबेगम फारुकमिया घारे रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड, जि. रायगड यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदणी मिळणेकरीता अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्री.मैताबबेगम फारुकमिया घारे यांचा जन्म दि. ०१/०६/१९५९ रोजी राहत्या घरी मौजे मांडला, ता. मुरुड- जंजिरा, ता.मुरूड जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांस त्यांचे जन्मप्रमाणपत्र आवश्यक होते परंतु सदरहू नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद अभिलेखावर घेण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. तरी सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास या जाहिरनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्या तर सदरहु न्यायालय त्याला मागणीप्रमाणे जन्म दाखला देण्याचे आदेश देईल.

आज दिनांक १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

### सुरमालती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
### जुन्या भाजी मार्केटजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड रजि. नं. आरजीडी/ओबीजी/एचएसजी (टीसी) /४०५७/२०१९/दिनांक ०३/०१/२०१९

जा. क्र. दिनांक :

**वारसा हक्क नोटीस**

आमच्या सोसायटीचे सुरमालती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पत्ता - जुने भाजी मार्केट जवळ, अलिबाग, ४०२२०१, फ्लॅट क्र.३०२ (1BHK तिसरा मजला) चे मालक स्व. कै. निलेश गजानन नाईक यांचे दि. २८/०१/२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर, खालील व्यक्तींनी या मालमत्तेवर वारस हक्काने हक्क सांगितला आहे.

वारसदार
१. श्रीमती. शिल्पा निलेश नाईक- पत्नी
२. कु. नील निलेश नाईक- मुलगा
३. कु. तीर्था निलेश नाईक- मुलगी
४. श्रीमती. सुगंधा गजानन नाईक- आई

उक्त फ्लॅटचे शेअर सर्टिफिकेट आणि मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास, त्यांनी ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सर्व पुराव्यांसह खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकतींची दखल घेतली जाणार नाही आणि सभासदत्व हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २१/०३/२०२६ सही/-
**सचिव/अध्यक्ष**
**सुरमालती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अलिबाग**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सोमनाथ धनाजी घरत, अनिता अमृत कडू, अनुज हरिश्चंद्र भरत, निर्मला चंद्रकांत घरत, प्रविण चंद्रकांत घरत, रमाबाई अनंत कडु, राजश्री संजय पाटील, रूपेश चंद्रकांत घरत, ललिता दत्ताराम पाटील, सलोनी हरिश्चंद्र घरत आणि अनुसया धनाजी घरत यांची सामाईक शेतमिळकत कायम खरेदीखताद्वारे विकत देण्याचे ठरविले आहे. सदरचे मिळकतीबाबत शेतकरी लवकरच खरेदीखत करण्याच्या बेतात आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**शेतमिळकतीचे वर्णन**
**मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड**

| गाव | भूमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु./पैसे |
|---|---|---|---|---|
| जासई, ता.उरण. | ४१ | २ | ०-२३-८०<br>पो.ख.०-०२-५०<br>एकूण ०-२६-३० | १.७५ |

तरी वरील मिळकतीचे वर्णनांत नमुद शेतमळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूली वाद, असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतल नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ११ दिवसांत माझे खालील पत्त्यावर पाठवून दयावी, उपरोक्त दिवसांत जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार खालील पत्त्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध निजोखमी आहे असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : धुतूम-उरण
ता. १४/०३/२०२६
सही/-
श्री. रूपेश चंद्रकांत घरत
जाहीर नोटीसोस संगती देणार

सही/-
**ॲड. किशोर धनाजी ठाकुर**
कार्यालय ऑफीस क्र. २. जय भवानी संकुल,
जय भवानी पेट्रोल पंप जवळ, जे. एन. पी. टी.
कलंबोळी रोड, पडखार गाव, पो. जासई
(व्हाया पनवेल - ४१०२०६) ता. उरण, जि. रायगड,

दि. /०३/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक भरत मिश्रीमल जैन व मोसमी प्रविण जैन यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बामणगाव ता.अलिबाग | २३०/१ | ०-२१-३०<br>पो.ख. ०-०५-२०<br>एकुण ०-२६-५० | ३.०३ |

वर वर्णन केलेली मिळकत या ही जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. ओमकार एस. कदम**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
मोबा. नं. ७७१९८४६५५४

श्री. जितेंद्र भगत
ॲडव्होकेट
अलिबाग- रायगड

### जाहीर समन्स

निशाणी नं. २४/ड

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात.**

रे.मु.नं. ७४/२०२५

श्री. मुजफ्फर शामीर सय्यद ..... वादी
**विरुद्ध**
श्री. शेषधर रामखेळावन पुष्कर .... प्रतिवादी.

प्रति,
१. शेषधर रामखेळावन पुष्कर,
रा. मु.पो. नवगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
यांसी,

ज्याअर्थी वर नमूद न्यायालयात वरील कामातील वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुद्ध दावा दाखल केलेला आहे. त्या दाव्याचे समन्स आपणांस आपल्या वरील पत्त्यावर वेळोवेळी बजावणीसाठी पाठवून देखील आपणांस सदर समन्सची आजपर्यंत बजावणी होवू शकली नाही.

त्याअर्थी तुम्हांस या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही या कामाची पुढील नेमली तारीख २.४.२०२६ रोजी स्वतः अगर अधिकृत वकीलांमार्फत वर नमूद न्यायालयात सकाळी ठिक ११.०० वाजता हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे, अन्यथा आपणास या दाव्याकामी काही सांगावयाचे नाही असे गृहित धरून पुढील निर्णय घेण्यात येतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १७.३.२०२६

कोर्टाचा शिक्का

**कनिष्ठ लिपीक,**
**दि.न्या.व. स्तर,**
**अलिबाग-रायगड**

**अधीक्षक,**
**दि.न्या.व. स्तर,**
**अलिबाग-रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची रो हाऊस मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. २६७ हिस्सा नं. ३ क्षेत्र १८.१०.०० आर.चौ.मी., आकार ३६.२० रू. पैसे. या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेल्या पलाझो रो हाऊस नं. बी ८ क्षेत्र ९६२.४१ चौ. फुट ( कारपेट ) (ग्रामपंचायत वरसोली मालमत्ता क्र. १७८६ क्षेत्र १११० चौ.फुट) हि बांधकाम मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली बांधकाम मिळकत हि विद्यमान मालक १) वैशाली उत्तम म्हात्रे, २) उत्तम गजानन म्हात्रे, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- २१/०३/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१




## राशीभविष्य

- **मेष** : पटत नसलेल्या गोष्टी कराव्या लागतील. दुहेरी अर्थाचे बोलणे टाळा. कोणाशी वितुष्ट घेऊ नका
- **वृषभ** : परिस्थितीचा अचूक फायदा घ्याल. विविध मार्गाने आर्थिक लाभ होतील. धनलाभ होईल.
- **मिथुन** : कोणत्याही प्रश्नावर प्रतिक्रिया देऊ नका. आळस टाळा. पतीपत्नीने वादविवाद टाळावे.
- **कर्क** : तुमच्या चांगल्या गुणांची पारख होईल. मालमत्तेचे व्यवहार पार पडतील. मित्रांची मदत मिळेल.
- **सिंह** : आळसामुळे चांगली संधी हुकवू नका. समतोल विचार करणं गरजेचच. कामात गुंतवून ठेवा.
- **कन्या** : कौटुंबिक सुखात भर पडेल. संतती समाधान देईल. नोकरीत पगारवाढ. बढतीचा लाभ होईल.
- **तूळ** : कोणास सल्ला देण्याच्या भानगडीत पडू नका. खर्च वाढणार नाही याची काळजी घ्या.
- **वृश्चिक** : सहजीवनाचा आनंद मिळेल. जुनी देणी देऊन टाकाल. घेतलेला निर्णय योग्य ठरेल.
- **धनु** : अडचणीत वाढ होईल. वृद्ध व्यक्तींच्या हट्टीपणाचा त्रास होईल. हातउसने पैसे देणं टाळा.
- **मकर** : परिस्थिती अनुकूल असेल. ज्येष्ठांच्या कृपाशीर्वादाने यश मिळेल. कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळेल.
- **कुंभ** : खोट्या आरोपांना तोंड द्यावं लागेल. कामं अर्धवट सोडू नका. सामाजिक संकेत तोडू नका.
- **मीन** : बेकारांसाठी सुवार्ता कळतील. प्रसिद्धीच्या झोतात राहाल. धनप्राप्तीचे योग चालून येतील.

सौंदर्यसाधना

## उपयुक्त टोनर्स

✲ संवेदनशील त्वचेसाठी गुलाब पाणी आणि कोरफडीचा गर यांच्या मिश्रणाने तयार झालेला टोनर वापरता येईल. यामुळे त्वचेचा लालसरपणा कमी होतो. चेहऱ्यावर सूज असेल तर हे टोनर वापरावं. अँटी एजिंग म्हणूनही याचा वापर करता येईल. कपभर गुलाब पाण्यात तेवढाच कोरफडीचा गर घालून हा टोनर तयार करता येईल.

✲ सतत मुरुमं येणाऱ्या त्वचेसाठी अँटी बॅक्टेरियल टोनरची गरज असते. चेहऱ्यावर डाग किंवा पिंपल असतील तर 'टी ट्री ऑईल' आणि 'केमोमाईल' युक्त टोनर वापरा. या टोनरमुळे त्वचा मुलायम आणि नितळ होईल. एक कप 'केमोमाईल'मध्ये दोन थेंब 'टी ट्री ऑईल' घालून हे मिश्रण टोनर म्हणून वापरता येईल.

✲ तेलकट त्वचा असणाऱ्यांनी तेलाचं प्रमाण कमी करणाऱ्या टोनरचा वापर करायला हवा. कोरफड, विच हेजल आणि गुलाब पाणी यांचा वापर करून टोनर तयार करा. यामुळे त्वचेचा तेलकटपणा दूर होऊन मुरुमांची समस्या कमी होईल. 'विच हेजल' ही एक प्रकारची वनस्पती असून तिचा वापर सौंदर्य प्रसाधनांमध्ये केला जातो. प्रत्येकी अर्धा कप गुलाब पाणी, विच हेजल आणि कोरफडीचा गर घेऊन मिश्रण तयार करा.

## २२ मार्च

दिनविशेष

**१९८४** : मराठी पत्रकार, लेखक प्रभाकर आत्माराम पाध्ये यांचा मृत्यू.
**२०१३** : दोघा भारतीय खलाशांच्या हत्येप्रकरणी संशयित असणारे इटलीचे खलाशी भारतात परतले.
**२०१६** : बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स बॉंबस्फोटांनी हादरली. ३४ ठार.
**२०१७** : ज्येष्ठ पत्रकार, लेखक गोविंद तळवलकर यांचे निधन.
**२०१८** : केंब्रिज ॲनालिटिका डेटा लीकप्रकरणी फेसबुकचे सीईओ मार्क झुकेरबर्ग यांनी माफीनामा देत चूक मान्य केली.

करीअर टिप्स

## 'आर्कियोलॉजिकल सायन्स'च्या जगात

'आर्कियोलॉजिकल सायन्स' म्हणजे 'पुरातत्त्व विज्ञान'. मानवाची उत्क्रांती, ऐतिहासिक घटना, इमारती अशा विषयांमध्ये रस असेल तर तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता. या क्षेत्रात करीअर करायचं असेल तर पदवीनंतर अभ्यासक्रमाची निवड करावी लागेल. विविध विद्यापीठांच्या पुरातत्त्व विज्ञान विभागात पदवीनंतरचे अभ्यासक्रम असतात. काही विद्यापीठांमध्ये हा विषय घेऊन पदवी मिळवण्याचा पर्याय आहे. यात बडोद्याचं महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ आणि बनारस हिंदू विद्यापीठ यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. यासोबतच काही महाविद्यालयांमध्ये पदवीनंतर डिप्लोमा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. यानंतर तुम्ही पुढे या क्षेत्रात संशोधन करून पीएचडी मिळवू शकता. 'आर्कियोबॉटनी', 'आर्कियोमेट्री', 'आर्कियोलॉजी', 'बॅटलफील्ड आर्कियोलॉजी', 'एन्व्हायर्नमेंटल आर्कियोलॉजी', 'जियो', 'मरीन', 'प्री-हिस्टॉरिक आर्कियोलॉजी'सारखे विविध विभाग आर्कियोलॉजिकल सायन्सशी संबंधित आहेत. हा अभ्यासक्रम केल्यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात तुम्हाला संधी मिळू शकते.

सल्ला मोलाचा

## हा अन्याय आहे

मी पंचवीस वर्षांचा युवक असून शहराच्या मध्यवस्तीत राहतो. जागा छोटी असली तरी मध्यवर्ती ठिकाणी असल्याने चांगली किंमत आहे. आमच्या शेजारच्या प्लॉटवर एका राजकीय क्षेत्रातील व्यक्तीने बंगला बांधायला काढला आहे. बंगल्यासाठी आणखी जागा मिळावी या हेतूने त्यांचा आमच्या राहत्या जागेवर डोळा आहे. सुरूवातीला त्याने जागा विकण्याविषयीचा संदेश आमच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. वडिलांवर दबाव आणला. या दबावामुळे वडील घाबरले. आईदेखील भयचिंतीत आहे. अशा परिस्थितीत काय करु हेच सूचत नाही.



– मित्रा, राजकीय क्षेत्रातील व्यक्तींचा दबाव काय असतो हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांची लालसा कोणत्याही थराला जाऊ शकते. पण अद्याप भारतात कायदाच सर्वश्रेष्ठ आहे हे विसरु नकोस. त्यामुळे न घाबरता आधी पोलिसांकडे संबंधित व्यक्तीविरुद्ध लेखी तक्रार दे. धमक्यांचं गांभीर्य प्रकर्षाने दाखवून दे. त्यांच्यापासून जीवे मारण्याच्या धमक्या आल्या असल्यास तू संरक्षणाची मागणी करु शकतोस. माध्यमांमध्ये तक्रार दिल्यासही या समस्येला वाचा फुटू शकते. यामुळे संबंधित व्यक्तीवर सामाजिक दबाव वाढू शकतो. कितीही धनदांडगे असले तरी कायद्याच्या कक्षेबाहेर कोणीही नाही आणि प्रसंगी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागतो हे तू अनेक उदाहरणांवरुन पाहिलं असेल. तेव्हा आई-वडिलांना जप आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठव.

## पंचांग

**रविवार, २२ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. ४, चंद्रराशी : मेष,
नक्षत्र : भरणी, योग : वैधृति,
सूर्योदय ६.४३, सूर्यास्त ६.४८

## फॉरवर्ड्स

**लाख़ समझाया उन्होंने हमें क़ी ग़ैरों से ना मिला क़र...**

**हँसकर हमनें कहाँ उनसें आप भीं तों पहले ग़ैर हीं थें...!**

## फॅशन पॅशन

दोस्तांनो, टी शर्ट हा तुमच्या वॉर्डरोबमधला सर्वात आरामदायी पर्याय. टी शर्ट कसेही वापरता येतात. जीन्स, शॉर्टस, फॉर्मल्स, चिनोज यापैकी कशावरही शोभून दिसत असल्याने ते हवेहवेसे वाटतात. बाजारात अनेक प्रकारचे टी शर्टस मिळतात. म्हणूनच यातही तुम्ही वैविध्य जपू शकता. ✲ 'सॉलिड' टी शर्टस तुमच्याकडे असायला हवे. ब्लॅक आणि व्हाईट टी शर्टला पर्याय नाही. मात्र लवेंडर, आकाशी, बेज अशा पेस्टल शेड्ससोबतच नेव्ही ब्लू, बॉटल ग्रीन, लाल रंगाचे टी शर्टस खरेदी करा. यामुळे लेअरिंगचे बरेच पर्याय खुले होतात. **(क्रमशः)**

भटकंती

## भटकंती तीर्थन व्हॅलीतली

नेहमीच्या धबडग्यातून ब्रेक हवा असेल तर तीर्थन व्हॅलीला भेट द्यायलाच हवी. इथल्या भटकंतीची सुरूवात 'जिभी वॉटर फॉल'पासून करा. ✲ 'जलोरी पास' आणि 'सिलोरसार लेक' अजिबात सोडू नका. इथे खूप छान वाटतं. इथला तलाव डोळ्यात साठवून घ्या. ✲ इथल्या 'चेहणी' गावाला नक्की भेट द्या. आकाराने लहान पण निसर्गसौंदर्याने समृद्ध असं हे गाव तुम्हाला नक्कीच खुणावेल. इथे 'चेहणी कोठी' नावाची इमारत आहे. लाकडाची ही इमारत १,५०० वर्षं जुनी असल्याचं बोललं जातं. भुकंपामुळे वरचे पाच मजले पडले असले तरी लाकडावरचं कोरीव काम नजरेत भरतं. ✲ मार्च ते जून हा 'तीर्थन व्हॅली'ला भेट देण्याचा योग्य काळ. या काळात हे खोरं फुलं आणि फळांनी बहरून गेलेलं असतं. इथे धाडसी खेळही खेळता येतील. उन्हाळ्यात 'जालोरी पास' आणि 'हिमालयन नॅशनल पार्क' परिसरात ट्रेकिंग करता येईल. ✲ रिलॅक्स होण्यासाठी मार्च ते जून दरम्यान इथे जा. ✲ भुंटर विमानतळावरून 'तीर्थन व्हॅली'ला जाता येईल. रेल्वेनं जायचं असेल तर सिमल्याला उतरून पुढचा प्रवास करावा लागेल. चंडीगढपासून जवळ असणाऱ्या कालका स्थानकावरूनही या ठिकाणी जाता येईल.



खेचाखेची

## हरवलेला कुत्रा

**गंपू:** अरे, माझा कुत्रा हरवलाय.

**पिंटू:** मग तू पेपरमध्ये जाहिरात का देत नाहीस?

.
.
.
.

**गंपू:** अरे वेड्या, त्याला कुठे वाचता येतं!

## वेगळं काही

पाकिस्तानातल्या खैबर पख्तूनख्वा भागातलं एक वडाचं झाड १२१ वर्षांपासून अटकेत आहे. या झाडाला साखळदंडांनी बांधून ठेवण्यात आलं असून त्यावर 'आय ॲम अंडर अरेस्ट', असा फलकही लावण्यात आला आहे. १८९८ मध्ये ब्रिटिश अधिकारी जेम्स स्क्वॉयंड मद्यपान करून या परिसरात फिरत होता. हे वडाचं झाड वेगाने आपल्या दिशेने येत असल्याचा त्याला भास झाला. घाबरलेल्या जेम्सने ब्रिटिश सैनिकांना झाड ताब्यात घेण्याचे आदेश दिले. त्यांनीही झाडाला साखळदंडांनी बांधून टाकलं. १२१ वर्षांनंतरही या झाडाची साखळदंडांमधून मुक्तता झालेली नाही. हे झाड ब्रिटिशांनी केलेल्या अनन्वित अत्याचारांचं प्रतिक असल्याचं तिथल्या लोकांचं म्हणणं आहे.

सौंदर्यसाधना

## मान काळवंडली आहे?

सौंदर्यावर अनेक घटकांचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. हे माहीत असल्यामुळेच चेहऱ्याची टवटवी जपण्यासाठी बरीच मेहनत घेतली जाते मात्र मानेच्या स्वच्छतेकडे अनेकींचं दुर्लक्ष होतं. धूळ, धूर, प्रदूषण यामुळे मानेची त्वचा काळवंडते. सहाजिकच यामुळे सौंदर्यात बाधा येते. म्हणूनच मानेवर साठलेला मळ दूर करणारे उपाय योजायला हवेत. ✲ मानेवरील मळ दूर करण्यासाठी स्टीमिंग योग्य ठरतं. त्यासाठी गरम पाण्यात जाडसर टॉवेल भिजवून मानेभोवती गुंडाळावा. यामुळे त्वचेला आवश्यक तो ओलावा मिळतो आणि बंद रोमछिद्रं उघडून आतली घाण बाहेर येते. स्टीममुळे डेड स्किनही निघून जाते. ✲ याकामी एक्सफिलिएटिंग ट्रिटमेंट महत्त्वाची ठरते. त्यासाठी एक चमचा मीठ, चमचाभर बेकिंग सोडा आणि चमचाभर खोबरेल तेल एकत्र करुन या मिश्रणाने मानेवर मसाज करावा. यामुळे मळ जातो. ✲ व्हाईटनिंगसाठी चंदन पावडर, मुलतानी माती, लिंबाचा रस, निरसं दूध एकत्र करुन तयार झालेला लेप मानेवर लावावा. हा पॅक नॅचरल ब्लीचचं काम करतो आणि मानेचा वर्ण उजळतो.



## सुडोकू ८१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३ | | | | ७ | |
| | | | | | २ | | ५ | ९ |
| ४ | ९ | ८ | | | | ३ | | |
| | | | २ | | | | | ७ |
| | | ५ | | ६ | | ९ | | |
| २ | | | | | ४ | | | |
| | | ७ | | | | २ | १ | ६ |
| ३ | ५ | | ७ | | | | | |
| | ६ | | | | ९ | | | |

**टीप -**
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८०चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ६ | ३ | ८ | ७ | ४ | २ | १ | ५ |
| १ | ८ | ७ | २ | ६ | ५ | ३ | ४ | ९ |
| ४ | २ | ५ | ९ | ३ | १ | ८ | ७ | ६ |
| ३ | ४ | ८ | ७ | १ | ९ | ६ | ५ | २ |
| ५ | ९ | २ | ६ | ४ | ३ | १ | ८ | ७ |
| ७ | १ | ६ | ५ | ८ | २ | ४ | ९ | ३ |
| ६ | ७ | १ | ३ | ५ | ८ | ९ | २ | ४ |
| २ | ३ | ४ | १ | ९ | ७ | ५ | ६ | ८ |
| ८ | ५ | ९ | ४ | २ | ६ | ७ | ३ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ८१

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | | ४ | ५ | ■ | | ६ | | ■ | ८ | | ९ |
| १० | ■ | | ११ | | | ■ | | १२ | | ■ | १३ | ■ | | ■ |
| | | १४ | ■ | | ■ | १५ | १६ | ■ | | १७ | | १८ | | |
| ■ | २० | ■ | | २१ | २२ | | | | ■ | | ■ | | ■ | |
| २४ | | | | ■ | २५ | २६ | ■ | ■ | | | | ■ | २८ | |
| | | ■ | | २९ | | ■ | | | | | ■ | ३१ | ■ | |
| ३२ | ■ | | ■ | | | ■ | ३६ | | ■ | ■ | | | | |
| ३८ | | | | ■ | ३९ | | | ■ | ■ | | | ४१ | ४२ | ■ |
| ■ | | | ■ | ४४ | ■ | | ■ | ४५ | | | ४६ | ■ | | |
| ४७ | | ■ | | ४९ | | | ५० | ■ | | ■ | ■ | ५२ | | ५३ |
| | | ५४ | ■ | | ■ | | ■ | | | ■ | | ५७ | ५८ | ■ |
| ■ | ५९ | | | ६० | | ■ | | | ६१ | | ■ | | ■ | |
| ६२ | | | ■ | ■ | | ६४ | | ६५ | ■ | | ■ | ६६ | | ६७ |
| | ■ | ६८ | | ६९ | ■ | | ■ | ७० | | ■ | ७१ | | ■ | |
| ७३ | ■ | | ■ | | | ७४ | | ■ | | ७५ | | ■ | ७६ | |

**आडवे शब्द :-**
१) विजय मिळविलेला
३) राग
५) बळ, शक्ती
७) राघू
९) समुद्र
१०) अखंड
१२) मनाने घेतलेली भीती
१४) विषमच्या विरुद्ध
१५) रखवाली करणारा
१९) जन्म-मृत्यू
२१) पुष्कळ
२२) समुद्राच्या लाटांचा आवाज
२३) प्रहार, घाव
२४) मत्सर
२५) वजनदार
२६) बाजेची सुती पट्टी
२८) चहा पिण्याचे जोड साधन
३२) जिवलग मित्र
३३) माज, मस्ती
३४) समशेर
३६) सन्मानपूर्वक पाठवणी
३८) खोडसाळ, दुष्ट
४०) विपुलता
४१) सोन्याचा धागा
४३) मधुमक्षिका
४५) बासरी
४७) वडील
४८) वारंवार, पुन्हापुन्हा
४९) कारस्थान, लबाडी
५०) घोड्याला आवरणारी वादी
५२) वास कपाळावर लावण्याचा चंदनाचा ठिपका
५३) घट्ट बासुंदी
५४) जगाचे कालचक्र
५६) दगा देणारा
५९) तफावत, फरक
६०) धूर्त, लबाड
६२) स्तुती करणारा
६३) ऐट, तोरा
६५) वल्लरी
६७) प्रतिष्ठा, गळ्यामागचा अवयव
६८) सुळा
६९) मातीचा दिवा
७०) कावळा

**उभे शब्द:-**
१) नाना, अनेक
२) चांदणी
३) एकत्र करणे, जमविणे
४) धातूचा तंतू
५) टरफल
६) सुसर
८) पटल
१०) युद्ध
११) खवा
१३) रोखठोक, स्पष्टपणे
१४) मनाचा झालेला ग्रह
१६) सततचे लिखाण
१७) शरम
१८) रविवार
१९) सांभाळ, रक्षण
२०) नगारा इ वाद्ये ठेवण्याची जागा
२१) महासर्प
२३) तोरा
२७) काही काळ झालेला मुक्काम
२८) पंकज
२९) अधिकाराचे स्थान
३०) कुराणातील वचने
३१) मर्कट
३४) झडती
३५) एक शेंगभाजी
३७) सवाद्य मिरवणूक
३९) समई
४०) आईचा भाऊ
४२) सरसकट
४४) जलप्रपात
४६) मार्ग, रस्ता
४७) संगीतातील ठेका
४९) दफनभूमी
५१) घट्ट मारलेला विळखा
५२) गंगोदक
५५) समीक्षा
५६) प्रतिहल्ल्याकरता लपून बसणे
५७) सातव
५८) उगाच
५९) काजळ
६१) पगार
६४) पावसाची झड
६६) ज्वर
६७) मृदा, मृत्तिका

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | र्ध | व | ट | रा | व | ■ | स | ट्टा | ■ | आ | रा | म | ■ | वा |
| मो | ■ | खा | र | ■ | न | म | क | ■ | आ | या | त | ■ | अ | ■ |
| ल | ह | र | ■ | ला | वा | स | ट | ■ | भा | ळ | ■ | वि | मा | न |
| ■ | व | ■ | अ | व | स | ■ | ■ | मा | ळ | ■ | ता | ■ | प | र |
| अ | न | ल | ■ | णी | ■ | न | व | ल | ■ | ठा | क | र | ■ | ■ |
| स्त | ■ | हा | ■ | ■ | पा | व | ■ | दा | न | व | ■ | वा | न | वा |
| ■ | वि | न | र | ■ | प | र | क | र | ■ | ठि | क | ■ | स | र |
| ज | ■ | स | म | र | ■ | दे | ■ | ■ | मा | का | ■ | स | ■ | ण |
| व | खा | र | ■ | स | द | व | र्त | न | ■ | ण | ■ | मे | ल | ■ |
| ळ | ■ | ■ | क | ■ | शा | ■ | ■ | ग | ज | ■ | हा | ट | क | र |
| पा | ला | पा | चो | ळा | ■ | अ | ज | ■ | व | ग | र | ■ | वा | सा |
| स | ■ | व | री | ■ | वा | न | र | ■ | स | रा | ■ | चो | ■ | ■ |
| ■ | का | न | ■ | अं | ■ | व | ■ | आ | ■ | ■ | रा | ख | व | ड |
| दी | न | ■ | मा | ग | ■ | स | ■ | रा | णी | व | ■ | ■ | च | हा |
| ■ | स | मू | ह | ■ | ख | र | व | स | ■ | क्ष | ■ | भू | पा | ळी |





# सत्ताधाऱ्यांना विरोधक कोंडीत पकडेनात

**कळीच्या दोन प्रश्नांवरुन सध्या वातावरण ढवळून निघताना दिसत आहे. सिलेंडरच्या तुटवड्याने अवघ्या देशात खळबळ माजवली आहे. तशी ती मुंबई आणि इतर शहरांमध्येही तरंग उमटवत आहे. त्याविषयी जनतेत कोलाहल असला तरी सभागृहांमध्ये गरम चर्चा दिसत नाही. विरोधी पक्षातील मंडळी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरताना दिसत नाहीत. त्याला एखाद्या हाय प्रोफाईल राजकारण्याचाही मृत्यु अपवाद नाही.**

सध्या देशात आणि राज्यात नेहमीपेक्षा वेगळ्या विषयांवरुन वातावरण तापल्याचे पहायला मिळत आहे. देशात अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरसाठी सर्वसामान्यांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. अनेक लहान मोठ्या शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात गॅस सिलेंडरची प्रतीक्षा यादी रोज वाढत आहे. दुसरा सिलेंडर पंचवीस दिवसांनी नोंदवता येईल अशा सुचना असल्या तरी ग्रामीण भागात ही अट ४५ दिवसांची आहे. रिकामे सिलेंडर घेऊन लांबलचक रांगेत उभे असलेल्या स्त्री पुरूषांचे फोटो वृत्तपत्रांमधून रोज प्रसिद्ध होत आहे. नोटाबंदीच्या निर्णयानंतर बँकांच्या बाहेर लांबलचक रांगा दिसायच्या, तसे आता गॅस सिलेंडरसाठी सर्वत्र रांगा दिसत आहेत. गॅस पुरवठ्याची हमी केंद्र सरकार देत आहे, मग सर्वत्र सिलेंडरसाठी रांगा का लागत आहेत? ४०- ४२ डिग्री उन्हाचे चटके नि झळा सहन करत लोक रांगेत उभे आहेत, हे सरकारला दिसत नाही का? सिलेंडरचे ऑनलाइन बुकींग करण्यात अडचणी येत आहेत. गॅस एजन्सीचा नंबर मिळणे जिकीरीचे झाले आहे. नवा सिलेंडर मिळेल याची कोणी शाश्वती देत नाही. घरात चुलीवर स्वयंपाक करा, असे म्हणणे सोपे आहे, प्रत्यक्षात घरोघरी ते शक्य आहे का? उज्ज्वला योजनेतून सरकारने लक्ष लक्ष सिलेंडर दिले, गृहिणींना दिलासा दिला, मोठी जाहिरातबाजी झाली. पुढे सवलतीच्या दरातील सिलेंडर देणे बंद झाले; शिवाय सिलेंडरच्या किमती सतत फुगत गेल्या. त्यानंतर मात्र उज्ज्वला योजनेचे नाव कोणी घेतले नाही. जनतेचा आवाज विधिमंडळाच्या अधिवेशनात उठवण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची आहे. महागाई आणि गॅस सिलेंडरच्या टंचाईवरून सरकारला गदागदा हलवण्याचे काम विरोधी पक्षाने केले पाहिजे. प्रत्यक्षात अधिवेशन चालू असताना विरोधी पक्ष ढेपाळला आहे, असेच गेले काही दिवस दिसून आले.

केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना गॅस सिलेंडरच्या किमती वाढल्या की भाजपाचे झेंडे घेऊन महिला मोर्चा घोषणा देत रस्त्यावर उतरत असे. आजही सोशल मिडियावर भाजपाच्या रणरागिणी स्मृती इराणी प्रतिकात्मक गॅस सिलेंडर घेऊन धरणे आंदोलन करतानाचे फोटो व्हायरल होत आहेत. आज सारी जनता महागाई आणि गॅस सिलिंडरसाठी टाहो फोडत असताना विरोधी पक्षाला जनतेचा आक्रोश विधिमंडळात प्रभावीपणे का मांडता येत नाही? रोज वेगवेगळे घोषणा फलक हातात घेऊन विधानभवनाच्या पायऱ्यांवर वीस पंचवीस विरोधी आमदार घोषणा देतात आणि फोटो सेशन आणि चित्रिकरण पूर्ण झाले की निघून जातात. अशा पायऱ्यांवरील आंदोलनातून जनतेला न्याय मिळतो का? विधानसभेत आज विरोधी बाकांवर पन्नास आमदारही नाहीत. पूर्वी काँग्रेसचे सरकार असताना विरोधी बाकांवर अशीच स्थिती होती, पण विरोधी बाकांवरील मूठभर आमदार जनतेच्या प्रश्नांवर काँग्रेसच्या सरकारला घाम फोडत असत. काँग्रेसचे सरकार असताना विरोधी पक्षातील महिलांनी महागाई प्रतिकार संयुक्त समिती स्थापन करून मोठा दबदबा निर्माण

**अमृता पाटील**

केला होता. महाराष्ट्रामध्ये मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, कमल देसाई, प्रेमा पुरव, मंगला पारीख, सुधा वर्दे अशा समाजवादी विचाराच्या डझनभर महिला नेत्या शेकडो महिलांसह घोषणा देत, हातात लाटणी, थाळ्या किंवा घंटा घेऊन रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारत असत. मृणालताई तर देशभर लाटणीवाली किंवा पाणीवाली बाई म्हणून ओळखल्या जात असत. याच महागाई विरोधी समितीने मंत्रालयात धडक मारून तत्कालीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री हरिभाऊ वर्तक यांना घेराव घातला होता.

आता गॅस सिलेंडरसाठी कडकडीत उन्हात मोठमोठ्या रांगा लागल्या असताना राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ कुठे आहेत, असा साधा प्रश्नसुद्धा विरोधी पक्ष विचारत नाही. महाराष्ट्रात विरोधी बाकांवर असलेल्या उबाठा सेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या प्रमुख राजकीय पक्षांकडे महिला आघाडी आहे. पण महागाई आणि गॅस सिलेंडरच्या टंचाईवर विधिमंडळात किंवा रस्त्यावर उतरून कोणी आवाज उठवताना दिसले नाही. मुंबईमध्ये पंधरा हजारपेक्षा जास्त उपहारगृहे आणि खाणावळी आहेत. पैकी गॅसटंचाईमुळे तीस टक्के उपहारगृहे बंद पडली आहेत. देशात करोडो लोक रोज उपहारगृहात आपले पोट भरतात. रस्त्यावर सामान्यांना परवडणाऱ्या दरात मिळणारा वडा पाव, बुर्जी पाव, आम्लेट पाव, सामोसे मिळणे बंद झाले. अनेक हॉटेल्समधून पुरी बनवणे बंद झाले.पुढील काही दिवसांमध्ये हजारो बेकरी उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. भाजप नेते विरोधी पक्षनेते असते तर त्यांनी सरकारला सळो की पळो करून सोडले असते. अधिवेशनात सरकारला श्वास घेऊ दिला नसता. विरोधी पक्षाने अधिवेशनात कसे आक्रमकपणे प्रश्न मांडले पाहिजेत, हे आता भाजपाने शिकवायचे काय? केंद्रात संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होऊन तीन आठवडे झाले. विरोधी पक्षाने सरकारवर हल्ले चढवले खरे, पण या महत्वाच्या विषयावर सरकारची कोंडी केली असे कुठे दिसले नाही. जनतेच्या प्रश्नावर सभागृह दणाणून गेल्याची एकही घटना घडली नाही.

देशाची आर्थिक राजधानी वेठीस धरणाऱ्या सिलेंडरटंचाईबाबत महाराष्ट्रामध्ये अधिवेशनकाळात विरोधी बाकांवरून जयंत पाटील, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, सुनील प्रभु, भास्कर जाधव, अनिल परब, सतेज पाटील असे मोजकेच आमदार सरकारवर नेम धरून बोलताना दिसतात. विधिमंडळाचे हे पहिलेच अधिवेशन असे आहे की विधानसभा आणि विधान परिषद अशा दोन्ही सभागृहांमध्ये विरोधी पक्षनेताच नाही. विरोधी पक्षनेतेपदाची नेमणूक नियमानुसार होईल, असे अध्यक्षांनी सांगूनही बराच काळ लोटला. विरोधी नेता नसल्याने दोन्ही सभागृहात विरोधी बाकांवर जोश नाही. सर्वात गंभीर म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला बारामतीत विमान अपघातात मृत्यु झाला. हा घात होता की अपघात, याबाबतचा संभ्रम अजुनही दूर झालेला नाही. डीजीसीए चौकशी करत आहेत. पण नेमकी प्रगती लक्षात येत नाही. सीआयडी तपास कुठपर्यंत आला हे समजत नाही. विमान अपघाताची चौकशी सीबीआयकडे सोपवावी, अशी शिफारस राज्याने केंद्राला केली आहे. त्याचे पुढे काय झाले हे कळले नाही. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अजितदादांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. 'न झालेला सक्षम मुख्यमंत्री' अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केले. असे असले तरी अजितदादांच्या विमान अपघातातील मृत्युवर चर्चा घडवली जात नाही. सरकार आणि विरोधी पक्ष त्यासंबंधी बोलत नाहीत हे दुर्दैव आहे. आमदार रोहित पवार मुंबई, दिल्लीतील सर्व प्रमुख नेत्यांच्या भेटी घेऊन चौकशी पारदर्शक व्हावी अशी मागणी करत आहेत. पण सत्ताधारी पक्षाच्या काही जणांना त्यात राजकारण दिसते आहे.

सहा वेळा उपमुख्यमंत्री झालेल्या आणि अर्थमंत्री म्हणून ११ वेळा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या अजितदादांच्या विमान अपघातातील मृत्युवर सभागृहात चर्चा घडवावी म्हणून विरोधी पक्ष सरकारवर दबाव का आणत नाही? ते कोणाच्या दबावाखाली वावरत आहेत का? देवाभाऊ हे राज्याचे टॉप बॉस आहेत. केंद्रात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र ही घोषणा वास्तवात उतरली आहे. भाजपमध्येच नव्हे, तर महायुतीमध्येही देवाभाऊंचा शब्द अंतिम आहे. देवाभाऊंना नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचे भक्कम पाठबळ आहे. त्यांनी राज्यात भाजपा भक्कम केलीच, पण विरोधी पक्ष कमकुवत केला. सरकारला धडक प्रश्न विचारणारा विरोधी पक्ष विधिमंडळात नसेल तर जनतेच्या प्रश्नावर आवाज कोण उठवणार? एकंदरीत, कळीच्या दोन प्रश्नांवरुन सध्या वातावरण ढवळून निघताना दिसत आहे. सिलेंडरच्या तुटवड्याने अवघ्या देशात खळबळ माजवली आहे. तशी ती मुंबई आणि इतर शहरांमध्येही तरंग उमटवत आहे आणि त्याच सुमारास राजकारणी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरताना दिसत नाहीत. त्याला एखाद्या हाय प्रोफाईल राजकारण्याचाही मृत्यु अपवाद नाही. ●●

**धनंजय शेटये**



# निष्पापाचा बळी एक शापित साम्राज्यवाद

बारुदाचा उग्र दर्प... आणि त्या धुरांड्यातून येणारा तो काळजाचा ठोका चुकवणारा भयाण शांततेचा आवाज! काही क्षणांपूर्वी जिथे कोवळ्या आवाजात कवितांचे सूर घुमत होते, तिथे आता फक्त रक्ताच्या थारोळ्यात पडलेली निर्जीव शरीरे... छिन्नविछिन्न झालेले चिमुकले हात-पाय आणि रक्ताने भिजलेले पांढरे शुभ्र गणवेश. तो चक्काचूर झालेला टिफिन बॉक्स, त्यात आईने प्रेमाने बनवून दिलेला आणि आता मातीत मिसळलेला तो अर्धवट खाऊ... आणि अस्ताव्यस्त पडलेली, रक्ताचे डाग लागलेली पुस्तके!

सकाळीच मम्मी-पप्पांचा हात धरून, रडत-हसत ती पाखरे शाळेत आली होती. ''संध्याकाळी लवकर घ्यायला या'' असं सांगत त्यांनी केलेला तो शेवटचा 'बाय'... पण त्यांना काय माहीत, तो प्रवास तिथेच संपणार होता! क्षणात होत्याचं नव्हतं झालं. आभाळ फाटलं आणि मृत्यूने साक्षात आग ओकली. शाळेतला तो रोजचा चिवचिवाट एका क्षणात कायमचा शांत झाला. त्या चिमुकल्यांना कुठला धर्म माहीत होता? त्या निष्पाप, हसऱ्या जिवांनी कोणाचे काय वाकडे केले होते?

हे कसले युद्ध? आणि कसला हा भेसूर साम्राज्यवाद? जिथे रणांगणावर सैनिकांच्या तलवारींऐवजी निष्पाप चिमुकल्यांच्या काळजाला चिरणाऱ्या किंकाळ्या ऐकू येतात, ते युद्ध कसले? सत्तेच्या हव्यासापायी, नकाशावरच्या रेषा गडद करण्यासाठी जर शाळकरी मुलांच्या कोवळ्या स्वप्नांची राखरांगोळी होत असेल, तर तो महासत्तांचा विजय नसून, संपूर्ण मानवतेला लागलेला एक अत्यंत काळा, किळसवाणा शाप आहे. वातानुकूलित बंकरमध्ये बसून युद्धाच्या घोषणा देणाऱ्या सत्ताधीशांना, त्या उद्ध्वस्त इमारतींखाली दबलेल्या मुलांचे शेवटचे हुंदके कसे ऐकू येत नाहीत? दररोज बातम्यांमधून दिसणारी ती रक्ताने माखलेली दप्तरे, रणांगणात विखुरलेल्या वह्या, अर्धवट उघड्या राहिलेल्या पाण्याच्या बाटल्या आणि धुळीत मिसळलेली चिमुकली चप्पल ही दृश्ये पाहून कोणत्याही संवेदनशील माणसाच्या अंगावर काटा उभा राहिल्याशिवाय आणि डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहत नाही. ज्या कोवळ्या हातांनी उद्याचे भविष्य लिहायचे होते, ते हात कायमचे थंडावले; ज्या डोळ्यांत उद्याची सुंदर स्वप्ने होती, ते डोळे कायमचे मिटले. चंद्र-मंगळावर पोहोचण्याची वल्गना करणारी आपली आधुनिक प्रगती, जर पृथ्वीवर मुलांचे बालपण सुरक्षित ठेवू शकत नसेल, तर ती प्रगती खऱ्या अर्थाने कवडीमोल आहे.

**अहंकाराच्या आगीत होरपळणारी माणुसकी**

सध्या इस्रायल आणि इराण यांच्यात भडकलेला वणवा आणि त्यात अमेरिकेसारख्या महासत्तांचा सहभाग पाहता, या सामर्थ्यप्रदर्शनाच्या आणि अहंकाराच्या राजकारणात सर्वात मोठा बळी कुणाचा जात असेल, तर तो मानवतेचा! बॉम्बच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात राजकारणाचे समर्थन सहज होते, पण त्या भयावह आवाजाखाली दबलेले चिमुकल्यांचे हुंदके मात्र कुणालाच ऐकू येत नाहीत. दक्षिण इराणमधील मिनाब शहरातील 'शजरेह तय्येबा' या प्राथमिक मुलींच्या शाळेवर झालेल्या कथित हल्ल्याच्या बातमीने संपूर्ण जगाला हादरवून सोडले आहे. हसत्या-खेळत्या मुलींचा वर्ग एका क्षणात रक्ताळलेल्या कबरस्तानात बदलणे... हे केवळ एक लष्करी ऑपरेशन नाही, तर मानवजातीच्या अंतःकरणावर झालेला अत्यंत खोल वार आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली निष्पाप जिवांचा बळी घेणे हे शौर्य नसून ती निव्वळ अमानुषता आहे.

सत्ताधाऱ्यांच्या अहंकाराला खतपाणी घालण्यासाठी जर बालकांच्या चितांवर राष्ट्रवादाची पताका फडकवली जात असेल, तर तो राष्ट्रवाद नसून राक्षसी प्रवृत्तीचा नंगानाच आहे. बंदुकीच्या गोळ्यांना चेहरे दिसत नसले, तरी त्या झाडणाऱ्यांचे डोळे सत्तेच्या अंधाराने कायमचे आंधळे झाले आहेत का?

**मृत्यूच्या आकड्यांना सरावलेलो आपण...**

आज जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभं असल्याची भीती वाटू लागली आहे. याचे परिणाम केवळ रणांगणापुरते मर्यादित राहत नाहीत. आखाती देशांतील लाखो भारतीय नागरिक, परदेशात अडकलेले पर्यटक आणि अनिश्चिततेत जगणारी सामान्य कुटुंबे यांच्यावर भीतीचे सावट आहे. पण या सगळ्यात भयानक शोकांतिका ही आहे की, आपण या मृत्यूच्या तांडवाला सरावत चाललो आहोत. टीव्हीच्या स्क्रीनवर मृत्यू आता केवळ १०, ५०, १०० असे आकडे बनून उरलेत. पण त्या प्रत्येक आकड्यामागे उद्ध्वस्त झालेले एक घरटं असतं, आईच्या कुशीतून हिरावून घेतलेलं एक बाळ असतं आणि अपूर्ण राहिलेली स्वप्ने असतात, हे विसरणे म्हणजे जिवंतपणी मरण पावण्यासारखेच आहे.

**माणुसकी हाच सर्वोच्च धर्म**

माणुसकीचा खरा धर्म कोणत्याही देशाच्या, जातीच्या किंवा धर्माच्या सीमारेषांमध्ये अडकत नाही; तो लहान मुलांचे प्राण वाचवणे हेच आपले सर्वोच्च कर्तव्य मानतो. आज गरज केवळ सोशल मीडियावर वरवरचा निषेध नोंदवण्याची नाही, तर सर्वांनी आतून हादरून जाऊन अंतर्मुख होण्याची आहे. त्या निष्पाप आत्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्या ''आमचा काय दोष होता?'' या मूक प्रश्नाची आपल्याला तीव्र लाज वाटली पाहिजे.

जोपर्यंत युद्धाचा हा अहंकारी वणवा आणि सूडाची भावना विझत नाही, तोपर्यंत जागतिक शांतता हे एक मृगजळच राहील. करुणा, संयम, सहअस्तित्व आणि संवादाच्या मार्गानेच या रक्तरंजित अंधारातून प्रकाशाचा किरण दिसू शकतो. मानवतेच्या नावाने आणि त्या कोमेजलेल्या कळ्यांच्या स्मरणार्थ, जगाने आता तरी शहाणे होण्याची गरज आहे; कारण...

युद्धात कोणताच देश खऱ्या अर्थाने जिंकत नसतो, तिथे हरते ती फक्त आणि फक्त माणुसकी! ●●

# आंतरिक आत्मसन्मान एक विशेष पैलू



**सुनील गवळी**

''टाळ्यांपेक्षा विश्वास द्या विद्यार्थ्यांच्या मनाला बाह्य मान्यतेची नाही, अंतरिक आधाराची गरज आहे''

आज शिक्षण केवळ गुण, रँक आणि स्पर्धा यापुरतं मर्यादित राहिलेलं नाही.

विद्यार्थी, पालक आणि शिक्षक तिघेही एका अदृश्य ताणाखाली जगत आहेत.

हा ताण अभ्यासाचा नाही.

तो आहे सतत मान्यता मिळवण्याचा.

विद्यार्थ्यांच्या मनात काय चालू असतं?

आजचा विद्यार्थी अभ्यास करतो

पण त्याच्या मनात एक प्रश्न सतत असतो

''मी चांगला आहे का?''

''आई-बाबा खुश आहेत का?''

''सरांनी कौतुक केलं नाही म्हणजे मी कमी पडलो का?''

''माझे मार्क्सच माझी किंमत आहेत का?''

विद्यार्थी अपयशाला घाबरत नाही, तो नाकारलं जाण्याला घाबरतो.

पालक नकळत काय करतात?

पालक प्रेमाने म्हणतात ''आम्हाला तुझ्याकडून खूप अपेक्षा आहेत.''

ही अपेक्षा प्रेरणा असू शकते, पण जेव्हा ती तुलना बनते तेव्हा ती दडपण बनते.

''शेजारचा मुलगा पहिला आला''

''तू अजून मोबाईलमध्येच''

''आम्ही तुझ्यासाठी इतकं करतो''

या वाक्यांमधून संदेश असा जातो ''तू जसा आहेस तसा पुरेसा नाहीस.''

मग विद्यार्थी स्वतःवर नाही, तर इतरांना खूश ठेवण्यावर जगायला लागतो.

शिक्षकांची भूमिका का निर्णायक आहे?

शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे शिल्पकार असतात.

शिक्षकांनी केलेली एक सकारात्मक नोंद विद्यार्थ्याच्या आयुष्यभरासाठी ऊर्जा बनू शकते.

आणि एक नकारात्मक टिप्पणी

त्याच्या मनात कायमचा ''मी नाही करू शकत'' हा ठसा उमटवू शकते.

शिक्षक केवळ विषय शिकवत नाहीत, ते स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवतात.

शाळेत कशी दिसते?

गुण कमी आले की विद्यार्थी स्वतःला अपयशी समजतो.

कौतुक न झाल्यास प्रयत्न करण्याची इच्छा कमी होते.

चुका लपवण्याची सवय लागते.

प्रश्न विचारायला भीती वाटते.

तुलना हीच प्रेरणा बनते.

ही अवस्था धोकादायक आहे, कारण विद्यार्थी शिकण्यासाठी नाही, तर मान्यता मिळवण्यासाठी शिकू लागतो.

शिक्षणाचं खरं उद्दिष्ट काय असावं?

शिक्षण म्हणजे फक्त यशस्वी माणूस घडवणं नाही.

शिक्षण म्हणजे स्वतःला स्वीकारणारा माणूस घडवणं.

ज्याला स्वतःची किंमत माहिती आहे, तोच खऱ्या अर्थाने यश हाताळू शकतो.

एक साधं उदाहरण

रोप लावताना आपण त्याला रोज ओढून मोठं करत नाही. आपण माती, पाणी, प्रकाश देतो. मग ते स्वतः वाढतं.

विद्यार्थ्यांनाही तसंच आहे दडपणाने वाढ होत नाही, विश्वासाने वाढ होते.

**पालकांसाठी समुपदेशन संदेश**

✻ मुलाच्या प्रयत्नाचं कौतुक करा, फक्त निकालाचं नाही.

✻ तुलना टाळा प्रत्येक मूल वेगळं असतं.

✻ ''तू आमच्यासाठी महत्त्वाचा आहेस'' हे शब्दांनी सांगा.

✻ अपयशाला शिक्षा नाही, संवाद द्या.

**शिक्षकांसाठी समुपदेशन संदेश**

✻ चुका म्हणजे शिकण्याची संधी म्हणून वातावरण तयार करा.

✻ विद्यार्थ्याला प्रश्न विचारायला सुरक्षित वाटलं पाहिजे.

✻ सार्वजनिक टीका टाळा, वैयक्तिक मार्गदर्शन द्या.

✻ गुणांपेक्षा जिज्ञासेला प्रोत्साहन द्या.

**विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन संदेश**

✻ तुमची किंमत मार्कशीट ठरवत नाही.

✻ प्रयत्न तुमचे आहेत त्यामुळे प्रगतीही तुमचीच असेल.

✻ इतरांशी नाही, कालच्या स्वतःशी तुलना करा.

✻ स्वतःला रोज एकदा सांगा ''मी शिकतोय, म्हणजे मी वाढतोय.''

आपण सर्वांनी लक्षात ठेवावं

टाळ्या प्रेरणा देऊ शकतात,

पण आत्मविश्वास आतूनच उभा राहतो.

जर घर, शाळा आणि समाज

विद्यार्थ्याला सतत मान्यता मागायला शिकवतील, तर तो आयुष्यभर असुरक्षित राहील. पण जर आपण त्याला स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवलं, तर तो कुठल्याही परिस्थितीत स्थिर राहील.

**अंतिम विचार**

विद्यार्थ्यांना यशाची भीक मागायला शिकवू नका, त्यांना स्वतःची किंमत ओळखायला शिकवा. कारण मान्यता मिळाल्यावर आनंद होतो, पण आत्मसन्मान जागा झाला की आयुष्य घडतं. ●●

# भोंदूबाबा खरातांचे ''सैतानी'' कारनामे..!

**॥ ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करोनी म्हणती साधू ॥ अंगी लावूनिया राख। डोळे झाकूनी करती पाप ॥ गाऊनी वैराग्याच्या कळा। भोगी विषयांचा सोहळा ॥ तुका म्हणे सांगू किती। जाणोनिया त्यांची नीती ॥**





**शिवाजी चौगुले**

भारताच्या शास्त्रज्ञांनी, तंत्रज्ञानांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर चंद्राला गवसणी घातली. सर्व क्षेत्रात देशाची प्रगती झाली. सुशिक्षितांचे प्रमाण वाढले. सध्याच्या स्मार्ट फोन दूरसंचार क्षेत्रातल्या क्रांतीनंतरही भारतीय समाजाची अंधश्रध्दा, भोळेपणा, रूढीपरंपराच्या जोखडा तून मुक्तता मात्र झालेली नाही. परिणामी गेल्या काही वर्षात भारताच्या सर्वच भागात भोंदू, बुवा, साधू, तांत्रिक मांत्रिकांचे खूळ प्रचंड प्रमाणात वाढले आहे. समाजाच्या याच अंधश्रद्धची संधी साधत उपटसुंभ आणि मवाली वासनांध बुवांनी आपले स्तोम माजवले आणि त्यांच्या अंधश्रद्ध भक्तांनी या असल्या मवाली भोंदूच्या पायावर लोळण घेत ही भोंदूगिरी अधिकच वाढवायचा करंटा उद्योग केला. आसाराम बापू, राम रहिम, रामपाल यासह अनेक ढोंगी बुवा महिलांवरचे अत्याचार, गुन्हेगारी, गुंडगिरी, खंडण्या अशा गुन्ह्यासाठी शिक्षा भोगल्या. भोळ्या भाबड्या भक्तांची संकटातून सुटका करण्याची ग्वाही देणारे हे भोंदू तुरुंगात खडी फोडायला गेले. भोंदू आणि ढोंगी बुवांचे बुरखे टराटर फाटले गेले. त्यांचे कटकारवाया, वासनाकांडे, चव्हाट्यावर आली. तरीही भारतीय समाजातला भोळसपणा मात्र संपलेला नाही, हे दुर्दैव होय आणि या असल्या भोंदू बुवाबाजीचे प्रस्थ अद्याप कायम असल्याने अलिकडेच वासनाकांडाने गाजायला लागल्याने तथाकथित तांत्रिक ज्योतिषी असल्याचा दावा करणाऱ्या भक्तांना लुटणाऱ्या महिलांची अब्रू घेणाऱ्या कॅप्टन अशोक खरातला पोलिसांनी बेड्या ठोकल्यानंतर त्याच्या बुवाबाजीचा जाहीर पंचनामा सुरू झाला आहे.

एक काळ व्यापारी जहाजावर कॅप्टन असलेला हा खरात निवृत्त झाल्यावर पाथर्डी परिसरात आला आणि त्याने आपल्याला ब्रह्मसाक्षात्कार झाल्याचा दावा करत आपले स्तोम माजवले. सर्वसामान्य भोळीभाबडी माणसेही त्याच्या भूलथापांना बळी पडली. इतकेच काय पण शासनाचे वरिष्ठ अधिकारी, मंत्री, संत्री, आमदार, खासदार, प्रतिष्ठित महिला यासह व्यापक प्रमाणात त्याच्या भक्तगणांची संख्या वाढत गेली. तो अनेक चमत्कार घडवत असल्याचे संतती होत नाही त्यांना संतती होत असल्याचा बोभाटा त्याच्या भक्तांनी केला. परिणामी या भोंदू आणि मवाली खराताचे प्रस्थ आणि दबदबा प्रचंड वाढला. त्याच्या तथाकथित ईश्वरी अवताराच्या खोट्या कथा रंगायला लागल्या आणि नेमका याच संधीचा लाभ उठवत या नीच माणसाने अनेक महिलांवर अत्याचार केले. निर्लज्जपणाचा कळस गाठत विवाहित महिलांना धमक्या देऊन त्यांच्याकडून खंडण्या वसूल करीत त्यांच्यावर अत्याचार केले. त्यातील एका पीडित महिलेने धाडसाने पोलीस ठाण्यात त्याच्या विरुध्द फिर्याद दाखल केली आणि या खराताचा ढोंगाचा बुरखा फाडला. त्याची पापे उजेडात आली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात त्याच्या विकृत चाळ्याच्या ५८ ध्वनिचित्रफिती पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याच बुवाबाजीचा फायदा घेत या खराताने थोडी थोडकी नव्हे तर अवघ्या १० वर्षात तब्बल २०० कोटी रुपयांची मालमत्ता आणि संपत्ती जमवल्याचे निष्पन्न झाले आहे. मंत्री, आमदार, महिला आयोगाच्या अध्यक्षासह शेकडो महिलाही त्याच्या नादी लागल्या होत्या. शेकडो जणांचे जीवन उद्ध्वस्त करणारा हा चमत्कारी, वासनांध बाबा आता मात्र पोलिसांचा पाहुणचार घेतो आहे. हे सारे प्रकरणच संतापजनक आणि सुन्न करणारे आहे. आपला समाज या असल्या भोंदू बुवाबाजीच्या कराल विळख्यातून कधी मुक्त होणार...? ●●

## महिला दिन

# असामान्य यशाची शतकपूर्ती




**आदिती वैद्य**

८ मार्च रविवार २०२६

अभूतपूर्व, असामान्य, अलौकिक, अप्रतिम किती किती विशेषणे वापरली तरी त्या उत्तुंग यशाचे वर्णन शब्दात करणे अशक्य आहे. १९२६ या वर्षात कुमारी वेणू अभ्यंकर या विद्यार्थिनीने हुजूरपागा या शाळेत त्या काळातल्या गुजरात कर्नाटक गोवा महाराष्ट्र या सर्व प्रांतातून होणाऱ्या मॅट्रिक म्हणजेच शाळेतील सर्वात वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या एकत्रित परीक्षेत सर्वात जास्त गुण मिळविले. प्रथम क्रमांकाचे तिला यश मिळाल्यामुळे इतिहासच निर्माण झाला. असं अभूतपूर्व यश मिळवणं आता अशक्यच आहे! या यशाची शतकपूर्ती समारंभाने साजरी करण्याचे तिच्या मुलांनी ठरविले हेही असामान्य. वेणू अभ्यंकर यशस्वी कशी झाली? का झाली? हे नवीन पिढीला माहिती करून देणे हे अत्यंत आनंदाचे, सुखाचे कार्य करणे त्यांना खूपच महत्त्वाचे वाटले. शाळेच्या प्रत्येक इयत्तेमध्ये प्रत्येक वर्षी वेणू पहिला नंबर मिळवत होती. स्कॉलरशिपही तिने चुकवली नाही. वेणूची आई ती तेरा वर्षांची असताना कालवश झाली. वेणूचे वडील महादेव गोविंद अभ्यंकर यांनी वेणूला आईची माया दिली. वडिलांचे आधुनिक गरजेचे प्रत्यक्ष शिक्षण दिले. स्वयंपाक पाणी आणि गरजेपुरतं सर्व समजावून सांगितलं. १९१५/१६ या वर्षात शाळेत घालून शिक्षण चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले. आप्पा बळवंत चौकापासून हुजूरपागा जवळ होती. वेणूच्या अभ्यासाकडे वडिलांचे बारीक लक्ष होते. वेणूला अभ्यासाची मनापासून आवड होती. अतिशय मनापासून सर्व अभ्यास करणे तिला जमत होते. त्यामुळेच वार्षिक परीक्षेत सर्व वर्गामध्ये जास्त गुण मिळवून ती पहिला नंबर सातत्याने मिळवत होती. मॅट्रिकच्या परीक्षेत तिने तेच यश मिळविले. तिला स्वतःला फार काही मोठे यश मिळवले असे वाटले सुद्धा नाही. नेहमीप्रमाणे पहिला नंबर मिळवला असेच तिला वाटत होते. महादेव गोविंद अभ्यंकरांना मात्र या यशाचे महत्व माहित होतं पटलं होतं. आज आपण २०२६ या वर्षात आहोत. १९२६ पासून आज २०२६ यात शंभर वर्षाचा काळ लोटला आहे. आज तिच्या त्या उत्तुंग यशाला शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. केवळ मॅट्रिकच्या परीक्षेत पहिला नंबर मिळवून वेणू अभ्यंकर तिथे थांबली नाही तर तिने बीए, एम ए, बी टी अशा पदव्या मिळवून नोकरीत स्थैर्य मिळविले. या पदव्या ठिकठिकाणी शाळांमध्ये नोकरी करून वेणूला प्राप्त कराव्या लागल्या. तिने नोकऱ्याही जबलपूर, आग्रा, जुब्बल अशा वेगवेगळ्या शहरांमध्ये स्वतंत्र राहून मिळवल्या. तिच्या वडिलांनी माधवरावांनी वेणूला अख्ख्या भारताच्या प्रवासाला वेळोवेळी नेऊन तिला स्वावलंबनाचे धडे दिले होते. वेणूला त्यांनी धीट केले. भावनांचा पगडा बसू दिला नाही. तिच्या पुढच्या आयुष्याच्या प्रवासासाठी त्यांनी तिला योग्य ती सर्व शिदोरी बांधून दिली होती. बुद्धिमान असल्यामुळे सर्व नातेसंबंध कसे जपायचे असतात याचे जणू तिला बाळकडूच मिळाले होते. ठिकठिकाणीच्या नोकरीतले अनेक अनुभव पदरी बांधून १९३५ या वर्षात वेणू अभ्यंकर हिने वडिलांच्या सूचनेप्रमाणे, आग्रहामुळे पुण्यात वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला आणि पुणे येथे अप्पा बळवंत चौकात आपल्या वडिलांबरोबर महादेव गोविंद अभ्यंकरांबरोबर रहाण्याचे ठरविले. उत्तर हिंदुस्थानात नोकऱ्या केल्यामुळे हिंदी उर्दू भाषांवरही तिने प्रभुत्व मिळविले होते. पुण्यात उर्दू शाळेतच तिला नोकरी मिळाली. प्रत्येक गोष्ट कामगिरी अभ्यास वेळच्यावेळी करणे ही वेणूची शिस्त होती. वेळच्यावेळी आणि मनापासून केलेले काम फक्त यश देते अशीही तिची श्रद्धा होती. वेणू अभ्यंकरला जोडीदाराविषयी विचार करायला अवधीच जणू गवसला नाही. तिला विद्वान आणि बुद्धिमान माणूस जोडीदार म्हणून पाहिजे एवढी मात्र तिची रास्त अपेक्षा होती. सहवासाने बुद्धीला खाद्य मिळाले पाहिजे अशी इच्छा मात्र होती. तिची इच्छा योग्यच होती. त्या काळात मुलीच्या करिअरला महत्त्व नव्हते, पतीच्या मोठेपणात पत्नी स्वतःला हरवून टाकत असे. वेणू अभ्यंकरला तिच्या इच्छेप्रमाणे विद्वान आणि बुद्धिवान असा धुंडीराज गोविंद विनोद नावाचा अत्यंत बुद्धिमान असा माणूस जोडीदार म्हणून भेटला. त्याच्या विद्वत्तेविषयी तिला शंका घेण्याचे कारण नव्हते, कारण त्यांना न्यायरत्न ही उपाधी शंकराचार्य डॉक्टर कृतकोटी यांनी बहाल केली होती. यामुळेच धुंडीराज गोविंद विनोद यांच्याबद्दल तिने योग्य जोडीदार म्हणूनच विचार केला. एका विद्वान माणसाची धुंडीराज गोविंद विनोदांची बुद्धिमत्ता, विद्वत्ता डॉक्टर कुर्तकोटींनी ओळखली होती. त्यामुळे वेणू अभ्यंकर आणि धुंडीराज गोविंद विनोद यांच्या विवाहाला त्यांनी नुसते अनुमोदनच दिले नाही तर पूर्ण आशीर्वाद दिला. त्या काळात गाजलेल्या दोन व्यक्तींनी त्यांचे वैवाहिक जीवन चार जुलै १९३८ रोजी सुरू केले. नोंदणी पद्धतीने ४ जुलै व वैदिक पद्धतीने पाच जुलै रोजी त्यांचा विवाह संपन्न झाला. विवाहानंतर वेणूची मैत्रेयी धुंडीराज विनोद झाली आणि तिची नोकरी चालू राहिली. तिने शिक्षिकेची नोकरी पत्करली होती. गणित आणि इंग्लिश तिचे विषय होते. गीता तिला पाठ होती आणि गीतेवर प्रवचने देण्यात तिचा हातखंडा होता. पुणे विद्यापीठातर्फे बही:शाल व्याख्यानमालेत ती सर्व महाराष्ट्रात प्रवचने देत असे. तिच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मॅट्रिकमध्ये पहिली येणारी वेणू अभ्यंकर कायमच मैत्रेयी विनोद म्हणून नावारूपाला आली. भारतातच नव्हे तर मुलांबरोबर अमेरिकेत राहिली. तेव्हाही ती गीतेवर प्रवचने देत असे. तिचे अफाट कर्तृत्व सर्वांना समजले नाही पण विनोदांना त्याची जाण होती त्यांनी तिचा सन्मान ठेवला. घरात आनंदी वातावरण ठेवले. मुलांना अभ्यासाचे उत्तम वळण लावले, शिक्षणाची गोडी निर्माण केली. संसाराची जबाबदारी तिने अत्यंत आनंदाने पेलली. सर्व मुले ही शाळा कॉलेजात सतत योग्य असे नाव कमावणारी ठरली. विनोदांची हुशारी मुलांनी टिकवली. आज ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करण्याकरता सिद्धाश्रमात आपण सर्वजण जमून जगातील गेल्या पिढीतील अत्यंत कर्तृत्ववान महिलेच्या यशाची शतकपूर्ती साजरी करीत आहोत हे भाग्याचे आहे तिच्या बुद्धिमत्तेला आणि कर्तुत्वाला शतशः ●●

## अनोखी भटकंती

# अनवट




**पुस्तक परीक्षण**

**प्रा. शाम जोगळेकर**

मो. ९२७३३४३१७७

'अनवट' शब्द, सूर, डोंगरवाटा, हे मिलिंद गुणाजी यांचे पुस्तक, राजहंस प्रकाशनने प्रकाशित केले आहे. सुरुवातीला ''अनवट वाटेवर पाऊल टाकताना..'' मध्ये मिलिंद गुणाजी यांनी आपले मनोगत मांडले आहे. या पुस्तकातील विविध लेख नवशक्तीच्या रविवार पुरवणीत वेळोवेळी प्रकाशित झाले आहेत. स्वतःविषयी ते लिहितात, ''...सदराच्या अनवट नावाप्रमाणे मीही अनवट व्यक्ती म्हणून ओळखला जातो. मी मूळचा इंजिनियर. पण दैवयोगाने मला वेगळीच वाट मिळाली. माझे वडीलही माझ्याप्रमाणे भटके. त्यांच्याकडूनच मला हा वारसा मिळाला.'' सुरांच्या साथीने डोंगरवाटा तुडवताना आलेले अनुभव मिलिंद गुणाजी यांनी, या पुस्तकातील विविध लेखांतून मांडले आहेत. या पुस्तकाचे देखणे आणि रंगीत मुखपृष्ठ मनोहर दांडेकर यांचे आहे. या पुस्तकात एकूण चाळीस लेख समाविष्ट आहेत. ललित आणि राजगड, या पहिल्या लेखात मिलिंद गुणाजी यांनी आपल्या विशेष आवडीच्या राजगडावर सविस्तरपणे लिहिले आहे. राजगड विविध वेळी कसा दिसतो, हे शब्दबद्ध केले आहे. त्यावेळी मिलिंद गुणाजी ललितच्या सुरांमध्ये हरवून गेले होते. सरत्या थंडीच्या काळात मिलिंद यांनी सुधागडला भेट दिली होती. त्यावेळचे सविस्तर वर्णन त्यांनी केले आहे. बरोबर मुलाखत घेण्यासाठी आलेली एक पत्रकारही होती. त्यावेळची ती शेकोटी, थंडी, गप्पा आणि गाण्याची मैफिल आयुष्यभर लक्षात राहील, असे मिलिंद लिहितात. लिंबा धरणाच्या दर्शनाचे वेळी संध्याकाळ झाली होती सोबत रशिदखान यांचे आर्त स्वर जोडीला होते. संथ पाण्यातील, वर आलेला, एक पर्णहीन बुंधा पाहून मिलिंद यांना कविता सुचते, त्यामध्ये ते शेवटी लिहितात...

**बदलत होते सखे सोबती**
**बुंधा तसाच निश्चल होता**
**संसारी पण तरीही विरागी**
**पुरुषाचे तो प्रतीक होता..**

**पार करो, अरज सुनो –** अलिबाग, या लेखामध्ये कुलाबा किल्ल्यातील भटकंतीचे अप्रतिम वर्णन आले आहे. त्यावेळीही त्यांना, त्यांच्या बरोबरच्या मित्रांना, अप्रतिम शास्त्रीय संगीताची साथ होती. भरतीच्या काळात सर्वांना, किल्ल्यामध्ये दीर्घकाळ थांबावे लागले होते, याची आठवण त्यांनी नोंदविली आहे. अलिबागला वेळोवेळी येणाऱ्या हौशी आणि उत्साही पर्यटकांनी, कुलाबा किल्ल्यात जाता-येताना भरतीओहोटीचा विचार करणे, किती आवश्यक आहे, याचा मिलिंद यांनी, स्वानुभवाने सुयोग्य इशाराच दिला आहे. एका इंग्रजी चित्रपटाच्या निर्मात्या टीमबरोबर, महाराष्ट्रातील लोकेशन्स पाहण्यासाठी मिलिंद यांच्या भटकंतीचा कसा उपयोग झाला, हे त्यांनी ''सह्याद्री आणि मारव्याचे सूर'' या लेखात उत्तम प्रकारे मांडले आहे. पावसाळा हा मिलिंदसारख्या कलाकारांना नेहमीच खुणावत असतो. त्यावेळी सह्याद्रीचे होणारे दर्शन, त्यांनी विविध लेखांत, सविस्तरपणे मांडले आहे. छत्रपतींची शिवलंका – सिंधुदुर्ग, महाराष्ट्र सिंधु सागराच्या अंतरंगात-सिंधुदुर्ग, काही ज्वलंत आठवणी-वसई, प्रतापगडावर, लेण्याद्री हे लेख विशेष वाचनीय आहेत. मिलिंद यांनी एरियल फोटोग्राफीचे आपले चित्तथरारक अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. डोंगरमाथ्यावरील विविध देवस्थानांचे दर्शनही मिलिंद यांनी घेतले, त्यांचे सविस्तर वर्णन त्यांनी नोंदविले आहे. या भटकंतीमध्ये वेळोवेळी मिलिंद यांना संगीताच्या साथीतूनच विविध काव्य स्फुरते, तेही काही लेखांचे शेवटी नोंदविले आहे. विविध रंगीत आणि कृष्णधवल समाविष्ट छायाचित्रे, सविस्तर लेख यामुळे हे पुस्तक गडकिल्ल्यांमध्ये भटकंती करणाऱ्यांना उत्तम मार्गदर्शक ठरणारे आहे. स्वैर भटकंती करणाऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी, कोणत्या गोष्टी टाळाव्यात हेही त्यांनी सुचविले आहे. मिलिंद गुणाजी या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाच्या कलंदर कलावंताची, या पुस्तकातून वाचकाला आगळीवेगळी उत्तम ओळख होते. अनवट, हे पुस्तक अगदी अलिकडचे नाही, परंतु माझ्या वाचनात प्रथमच आले. म्हणून त्याविषयी लिहावेसे वाटले. माझे काही सुजाण वाचक मित्र याविषयी वेळोवेळी चौकशी करतात. प्रथमच वाचनात येणारे पुस्तक नेहमीच, प्रस्तुत लेखकाला नवे असते, मग ते प्रत्यक्षात जुने असो किंवा नवे! ●●

**पुस्तकाचे नाव : अनवट**
**लेखक : मिलिंद गुणाजी**
**प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे-३०.**
**आवृत्ती पहिली : ऑक्टोबर २०११**
**पृष्ठे :१४४. किंमत : रु. १६०/-**

# पृथ्वीतलावर सर्वात अनमोल घटक पाणी

**जागतिक जल दिन (वर्ल्ड वॉटर डे ) दरवर्षी २२ मार्च रोजी साजरा केला जातो. गोड्या पाण्याच्या महत्वाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि जलसंवर्धनासाठी, पाणी वाचवण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. १९९३ पासून संयुक्त राष्ट्रांद्वारे हा दिवस साजरा केला जात आहे. ज्यात पाण्याची कमतरता या समस्येवर चर्चा केली जाते.**



**अरविंद सं. मोरे**

माणूस आणि पाणी यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. इतका जवळचा संबंध आहे की, माणूस पाण्याखेरीज जिवंतच राहू शकत नाही. पाणी हे मानवी शरीराचे मुख्य घटक आहे. मानवाला केवळ जीवन जगण्यासाठीच नाही तर मानवाच्या प्रत्येक गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाला पाण्याची नितांत गरज आहे. मग ते स्वच्छतेसाठी असो, परिसर स्वच्छ करणे असो की स्वतःचे शरीर असो की स्वतःचा निवारा बांधण्यासाठी असो त्याला पाण्याची नितांत गरज असते. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत मानव पाण्याच्या सानिध्यात असतो. ठळक मानाने असे म्हणता येईल की, जन्मापासून मृत्यूपर्यंत मानवाचे दृढ नाते पाण्यासोबत आहे. म्हणजे बाळ जेव्हा जन्माला येतं तेव्हा त्याला स्वच्छ करणं तर मानवाचा मृत्यू झाल्यावर त्याच्या अस्थी विसर्जन करेपर्यंत पाण्याचा आणि मानवाचा संबंध येतो.

आपण पाण्याला खूप पवित्र मानतो. तुम्ही कुठलाही धर्म केला नाही तरी चालेल पण पाण्याचा धर्म केला पाहिजे असे वारंवार म्हणत असतो. ह्याच्यात संस्कार म्हणून आपण अगोदर उन्हाळ्यात पाणपोई लावत होतो आणि निःस्वार्थ भावनेने पाण्याचे पवित्र दान करत होतो. ह्यात सर्व धर्माचे, जातीचे पातीचे, गरीब आणि श्रीमंत मनोभावे आपली तृष्णा भागवत होते. किती सुंदर भाव होता तो पानीदान करण्याचा.

मानवाचा आणि पाण्याचा संबंध हा भौतिक, व्यावहारिक आणि भावनिक सुद्धा आहे. पाण्याला मानवाने आपल्या जीवनात सर्वोच्च स्थान सुद्धा दिले आहे. कुठलाही धार्मिक विधी असो, त्यात पाण्याची महत्वपूर्ण भूमिका असते. त्याशिवाय तिची पूर्तता होऊ शकत नाही. माणसू पाण्याशिवाय राहूच शकत नाही हे त्रिकालाबाधीक सत्य आहे. म्हणून तर माणसाची पाण्यासाठी शोधा शोध सुरु असते. पाण्याचे महत्व मानवाने फार पूर्वीच जाणले आहे. त्यासाठी त्याने मोठं मोठे तलाव-धरणे यांचा शोध लावून भविष्यातील पाण्याची तरतूद व्हावी यासाठी ह्याची निर्मिती केली आहे. मानवाने पाण्याचे महत्व ओळखले. त्याने त्याची भविष्यातील गरज काय आहे हे सुद्धा ओळखले. माणसाची पाण्यासाठी आपण वेळोवेळी शोधाशोध सुद्धा बघितली आहे. नदी, दऱ्या खोऱ्यापर्यंत माणूस पाण्याच्या शोध घेत गेला आहे. काही काही प्रांतात पाण्यासाठी अपार कष्ट घ्यावे लागतात. तेव्हा पाणी उपलब्ध होते. जसे की, वाळवंटी प्रदेश. ह्या प्रदेशात माणसाची चांगलीच पायपीट होत असते.

माणसाचा पाणी हा जीवन आधार आहे. माणसाच्या शरीरात सुमारे ७०% पाणी असते. म्हणजेच काय तर माणूस पाण्याशिवाय फार काळ जिवंतच राहू शकत नाही. एव्हढेच नाही तर माणसाचा आणि पाण्याचा त्याच्या स्वास्थ्याचा फार जवळचा संबंध आहे. माणसाच्या शरीरात पाण्याचे प्रमाण कमी झाले की त्याचे स्वास्थ्य सुद्धा बिघडते. त्याला थकवा, डोकेदुखी यासारखे विकार होतात. एव्हढेच नाही तर माणसाचे वजन नियंत्रित राहण्यासाठी पाण्याची महत्वपूर्ण भूमिका असते. म्हणून हल्ली माणसाचे वजन वाढत असल्यामुळे त्याला जास्तीत जास्त पाणी पिण्याचा डॉक्टर सल्ला देतात. एवढे महत्त्व पाण्याचे मानवाच्या शरीरासाठी आहे.

पृथ्वीचा सुमारे ७०% भाग पाण्याने व्यापलेला आहे. त्यापैकी ९६% पाणी महासागरात खारे आहे. ते माणसाच्या पिण्यायोग्य नाही आहे. पाण्याचे अत्यंत कमी प्रमाण साधारणतः ३ ते ३.५% हे गोड्या पाण्याचे आहे म्हणजे ते पिण्यायोग्य आहे. पिण्यायोग्य पाणी अत्यंत मर्यादित असल्याने त्याचे संवर्धन करणे फारच गरजेचे आहे. कारण केवळ १% पेक्षा कमी पाणी मानवी वापरासाठी उपलब्ध आहे. एकूण पाण्याच्या ९७% खाऱ्या पाण्याचे समुद्रात प्रमाण आहे. तर फक्त ३% पाणी पिण्यायोग्य उपलब्ध आहे. ही मानवासाठी खरोखर खूपच चिंतेची व धोक्याची घंटा आहे. ह्या आकडेवारीकडे बघितले की फार भयावह स्थिती आहे असे वाटते. आपण पेट्रोल, डिझेल, केरोसीन, कोळसा व वायू ह्याचा साठा कमी होत असल्याबद्दल फार चिंतेत असतो. परंतु आपण पाण्याबद्दल अजूनही जागृत नाही आहोत. ही एक आपल्यासाठी गंभीर समस्या आहे. ज्यामुळे भीषण पाणी टंचाई निर्माण होते आहे.

मानवासाठी पाणी बचत करणे फार गरजेचे आहे. ह्यासाठी दैनंदिन जीवनात नळ चालू न ठेवणे, गळती दुरुस्त करणे, शॉवर ऐवजी बादली वापरणे, भाजी, तांदूळ, डाळी हे नळाखाली न धुता ते भांड्यात घेऊन व ते पाणी झाडाला टाकणे. दात घासतांना, दाढी करतांना व हात धुतांना सतत नळ चालू न ठेवणे. जिथे कुठे गळती दिसत असेल ती ताबडतोब दुरुस्ती करणे. कारण ह्या गळतीमुळे लाखो लिटर पाणी हे वाया जास्त असत ते आपण बचत करू शकतो. शहरी भागातील मेड आपला वेळ वाचविण्यासाठी भांडी धुतांना नळ सतत चालू ठेवतात. त्यांना सांगूनही ते कानाडोळा करतात. त्यांना पाणी बचतीचे महत्व सांगणे फार गरजेचे आहे. त्यामुळे आपले लाखो लिटर पाण्याची बचत होऊ शकते.

सध्या विश्वात युद्ध सुरु आहे. अर्थात ह्या युद्धाचा कळीचा मुद्दा हा खनिज तेलाच्या वर्चस्वाचा आहे. जो तो खनिज तेलावर आपले वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न करतो आहे. असे म्हणतात की, आता तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यासाठी होईल.

शाक्य आणि कोलीय या दोन राज्यांच्या मधून रोहिणी नदी वाहत होती. रोहिणी नदीच्या पाण्यावरून यांच्यात भीषण वाद झाला. दोन्ही बाजुंनी युद्धाची तयारी झाली होती. जेव्हा बुद्धांना या संभाव्य युद्धाबद्दल समजले, तेव्हा ते त्या ठिकाणी पोहचले. त्यांनी दोन्ही बाजूंच्या सैनिकांना प्रश्न विचारला की, ''पाणी किती महत्वाचे आहे? त्यावर साऱ्यांनी पाणी मानवाच्या जीवनासाठी खूपच आवश्यक आहे हे सांगितले.'' मग बुद्धांनी म्हटले पाण्यासाठी तुम्ही रक्ताचे पाट का वाहता? बुद्धांनी समजावून सांगितले की रक्ताने पाणी भरून येणार नाही आणि युद्ध हे कोणत्याही समस्येचे समाधान नाही. त्यांच्या प्रेमाच्या आणि ज्ञानाच्या प्रभावाने दोन्ही कुळे युद्ध न करता शांत झाली. पाण्यासाठी युद्ध विरामाचा संदेश विश्वाला पहिल्यांदा गौतम बुद्धांनी दिला. एव्हढेच जागतिक जल दिनाच्या निमित्ताने. ●●

# पाणी वाचवा भविष्य वाचवा!

**विजय कोष्टी**

**मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी हवेच्या खालोखाल पाण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे पाण्याची आवश्यकता नाही. पाण्याशिवाय सजीव सृष्टीची कल्पनाच अशक्य आहे. म्हणूनच आपल्या संस्कृतीत पाण्याला 'जीवन' असे सार्थ नाव दिले गेले आहे. ग्रीक तत्त्ववेत्ता थेलीस म्हणतो, 'सर्व काही पाण्यातून येते आणि पाण्यातच परतते'. ('All comes from water and to water all returns' ) म्हणजेच सृष्टीची उत्पत्ती आणि अंत दोन्ही पाण्याशी जोडलेले आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची निर्मिती असो किंवा औद्योगिक विकास-सर्व काही पाण्यावरच अवलंबून आहे.**

**दरवर्षी २२ मार्च हा दिवस जागतिक जलदिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी (२०२६) जलदिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे, 'पाणी आणि लिंगभाव' (Water and Gender ). या थीमद्वारे पाण्याच्या व्यवस्थापनात महिलांचा आणि मुलींचा समान सहभाग सुनिश्चित करणे, लिंग समानता प्रोत्साहित करणे आणि पाणीटंचाईमुळे त्यांच्यावर होणाऱ्या असमान परिणामांकडे लक्ष वेधणे हा मुख्य उद्देश आहे. जगातील अनेक भागांमध्ये आजही महिलांवर आणि मुलींवर पाणी आणण्याची जबाबदारी असते. दररोज अनेक किलोमीटर पायपीट करून पाणी आणणे, तासन्तास रांगेत उभे राहणे, या गोष्टी त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनल्या आहेत. यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतोच, पण शिक्षण, रोजगार आणि स्व-विकासाच्या संधीही मर्यादित होतात. विशेष म्हणजे, घरगुती पाणी व्यवस्थापनात महिलांचा मोठा सहभाग असूनही पाणीविषयक धोरणनिर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. ही दरी भरून काढणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांना निर्णयप्रक्रियेत समान स्थान दिल्यास पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि समावेशक ठरते, असे अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे.**

**पृथ्वीवर सुमारे ९७ टक्के पाणी सागरी (खारट) आहे, तर केवळ १ टक्का पाणीच मानवासाठी उपयुक्त आहे. याच अल्प प्रमाणातील पाण्यावर संपूर्ण मानवजातीचे जीवन आणि प्रगती अवलंबून आहे. परंतु वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे हेच पाणी झपाट्याने प्रदूषित होत आहे. आजच्या काळात पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून एक रणनीतिक संसाधन (Strategic Resource) बनली आहे. अनेक तज्ज्ञांच्या मते, भविष्यातील संघर्ष पाण्यासाठी होऊ शकतात. त्यामुळे आजच पाण्याचे महत्त्व ओळखून त्याचे जतन करणे अत्यावश्यक आहे.**

**विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत काही उपाययोजना अत्यंत गरजेच्या आहेत. जसे की, पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाचे पाणी साठवण (Rainwater Harvesting ), नळगळती व पाईप फुटी त्वरित दुरुस्ती, नद्या, तलाव, विहिरी यांचे प्रदूषण रोखणे, शेतीमध्ये ठिबक व फवारणी सिंचनाचा वापर, सांडपाण्याचे पुनर्वापर (Recycle & Reuse), पाणी व्यवस्थापनात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे.**

**'थेंब थेंब जपला तर सागर साठतो' ही उक्ती आज अधिकच महत्त्वाची ठरते. प्रत्येकाने स्वतः पासून सुरुवात करून पाण्याचा योग्य वापर केला, तर मोठा बदल घडू शकतो.जलदिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी जलसाक्षर होऊन जलसंवर्धनासाठी प्रत्यक्ष कृती करणे ही काळाची गरज आहे. कारण, जल आहे तरच उद्याचा उज्ज्वल भविष्य आहे ! ●●**



# जिल्हाभरात मुस्लिम बांधवाकडून नमाज पठण



● रमजान ईद सणानिमित्त पनवेल येथील ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी सकाळी सामूहिक नमाज अदा केली. नमाजानंतर एकमेकांना मिठी मारत ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. (छायाचित्र: राजेश डांगळे)





● रमजान ईद निमित्त पनवेल मुस्लिम नाका परिसरातील मस्जिदमध्ये सकाळी नमाज अदा करून मुस्लीम बांधवांनी सणाची सुरुवात केली. यावेळी पनवेल शहर पोलिसांनी गुलाब देत मनापासून शुभेच्छा दिल्या. (छायाचित्र: राजेश डांगळे)



● माणगाव मस्जिद मोहल्ला येथे रमजान ईद निमित्त सर्व समाज बांधवांना रुमान जमादार, शुएब जमादार, तौसिफ सय्यद, शकील, सज्जाद शेख यांच्या हस्ते शरबत वाटप करण्यात आले. (छायाचित्र: सलीम शेख)



● महाडमध्ये रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पोलीस प्रशासनाच्या मार्फत देखील मुस्लिम बांधवांना गुलाब देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

**पाच ते सात वर्षांच्या चिमुकल्यांनी महिनाभर रमझानचे सर्व उपवास धरून पहिला रमझान महिना पुर्ण केला.**



झरान (७ वर्षे), म्हसळा (मुळ गाव महाड)



सैफ सुफियान वाडेकर (७ वर्षे), अलिबाग-चावडी मोहल्ला



मारूफ जमीर छापेकर (८ वर्षे), अलिबाग-शेखचेगाव



मसीरा मुशीर अहमद कादिरी (५ वर्षे), मुरूड-राजपुरी

## सर्वसामान्य नागरिकांकडून ईदीच्या शुभेच्छा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. येथील जामा मस्जिद, दारूल मोहल्ला मस्जिद, जामा मस्जिद मिरानगर, जामा मस्जिद बेणसेसह इतर ठिकाणी नमाज पठण करून मुस्लीम बांधवांकडून ईदचा सण साजरा करण्यात आला. राजकीय नेतेमंडळींपासून ते सर्वसामान्य नागरिकांनी ईदच्या या पर्वात सहभागी होत मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यासह मुस्लीम बांधवांनीही ईदची दुआ करताना सर्वांना सुख समाधान मिळण्यासह सलोख्यात वाढ व्हावी, अशी दुआ मागितली. मुख्य जामा मस्जिदमध्ये नाविन्यपूर्ण पेहराव करून आलेल्या छोट्या मुलांची लक्षणीय उपस्थिती होती.

# निवडक

## शिवरामकृष्णनांची समालोचनातून निवृत्ती


**चेन्नई** : भारताचे माजी फिरकीपटू लक्ष्मण शिवरामकृष्णन यांनी तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासानंतर ङ्गबीसीसीआयफच्या समालोचन पॅनेलचा निरोप घेतला. मात्र, निवृत्तीची घोषणा करतानाच त्यांनी केलेल्या धक्कादायक आरोपांमुळे वादळ निर्माण झाले आहे. एका चाहत्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, तुमचे म्हणणे बरोबर आहे, माझ्यासोबत रंगावरून भेदभाव झाला. इतकेच नव्हे तर,



टीव्ही प्रॉडक्शनमधील अंतर्गत गोष्टी बाहेर आल्यास चाहत्यांना धक्का बसेल आणि बीसीसीआयचाही विश्वास बसणार नाही, असा इशारा त्यांनी एका डिलीट केलेल्या पोस्टमध्ये दिला. रवी शास्त्रींवर निशाणाशिवरामकृष्णन यांनी माजी मुख्य प्रशिक्षक शास्त्री यांच्यावरही थेट हल्ला चढवला. शास्त्री प्रशिक्षक असताना मला टॉससाठी (नाणेफेक) एकदाही संधी देण्यात आली नाही, मात्र नवख्या समालोचकांना खेळपट्टीचा अहवाल देण्याची संधी सहज मिळत होती, अशी सल त्यांनी बोलून दाखवली.

## पुण्याला कुस्तीचे आठ वेळा यजमानपद

**बारामती :** महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे माहेरघर म्हणून पुण्याची ओळख आहे. मागील बारा वर्षांमध्ये आठ वेळा पुण्याने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यजमानपदाचा मान मिळवला आहे. केवळ चार स्पर्धा नागपूर, सातारा, अहमदनगर व जालना या शहरांत पार पडल्या. एकंदरीतच या स्पर्धेला पुण्यासारखा ग्लॅमर कुठेही मिळत नाही. हा ग्लॅमरपणा संघटना व मल्लांनाही हवा असतो. यामुळे पुणे हेच महाराष्ट्र केसरीचे माहेरघर ठरले आहे. स्वातंत्र्यानंतर १९५३ मध्ये महाराष्ट्र चॅम्पियनशिप स्पर्धेला सुरुवात झाली. नगरकर तालमीत मल्ल तुकाराम फाटक यांनी गेगांवकर सिदप्पा यांना चितपट करून चॅम्पियनशिप पदक मिळविले. १९६३ मध्ये महाराष्ट्र केसरी किताबासाठी दीड किलो चांदीची गदा देऊन गेवगावकर यांना गौरवण्यात आले. गामासोबत गोखले यांनी ही गदा पटकावली. यानंतर २००८ पासून वाघोलीत महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांचा विजयी क्रम.१२ वर्षांतील आकडेवारी २०१५, २०१७, २०१९, २०२०, २०२१, २०२३, २०२४, २०२६ (पुणे शहराला यजमानपद) २०१६- नागपूर, २०१८ - जालना, २०२२ - सातारा, २०२५ - नगर.महाराष्ट्र केसरी विजेत्याला चांदीची गदा व ५१ हजार रुपये रोख बक्षीस देण्यात येण्यास सुरुवात झाली.



# माथेरानमध्ये लाल मातीवर कुस्त्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**




माथेरान ग्रामस्थ मंडळ यांच्या माध्यमातून वसंतोत्सव साजरा केला जात आहे. यानिमित्ताने अनेक वर्षाची परंपरा असलेली लाल मातीतील कुस्ती यावर्षी देखील रंगली. ग्रामस्थ उत्सव मंडळ दरवर्षी गुढी पाडव्यापासून वसंतोत्सव साजरा केला जातो. हनुमान जयंतीपर्यंत साजरा होणाऱ्या या वसतोत्सवाची सुरुवात लाल मातीतील कुस्तीच्या आखाड्याने झाली. कुस्त्याप्रमाणे, राम नवमी, हनुमान जयंती देखील मोठया उत्साहात साजरी केली जाते. मंडळाचे प्रकाश सुतार, मराठा चंद्रकांत जाधव, अंनत शेलार, मुकेश तोरणे, नरेश शिंदे अनेकांच्या नियोजनाखाली वसंतोत्सव सुरू झाला. या कुस्त्यानिमित्त शेकडो पैलवान कुस्त्या खेळण्यासाठी माथेरानला आले होते. स्व. दिलीप शेठ गुप्ता आणि स्व. कुमार भाई चौधरी यांचे या कुस्त्यांना मोठे सहकार्य लाभयचे. आता नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी तसेच किरण जाधव, कुलदीप जाधव यांच्या सहकार्यामुळे आजही लाल मातीतील कुस्त्या रंगतात.

### मानाची कुस्ती

राज राम आखाडे माथेरान विशाल भगत (कर्जत) विरुद्ध कृष्णा चवरे (धाराशिव) बरोबरीत सुटली तसेच सुजित कल्याण ४०००, राकेशकुमार मुंबई, ५५०० दीपक हरियाणा ४०००, हरेश कराळे (मुंबई पोलीस) ३०००, संदीप (उत्तर प्रदेश) ३०००, किरण डवले (पनवेल) २०००, आनंद (माटुंगा मुंबई) ६५०० शेवटची कुस्ती अशी झाली.

# ‘महिला मॅरेथॉन’ मध्ये तळेरे विद्यालय प्रथम

**। तळेरे । प्रतिनिधी ।**

तळेरे येथे आयोजित जिल्हास्तरीय महिला मॅरेथॉन स्पर्धेत येथील वामनराव महाडिक माध्यमिक विद्यालयाच्या मुलींनी बाजी मारली. श्री फोंडकण देवी अकॅडमी निरोम, वामनराव महाडिक माध्यमिक विद्यालय तळेरे, सिंधुदुर्ग जिल्हा मास्टर्स थलेटिक्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय महिला मॅरेथॉन स्पर्धा व महिला क्रीडारत्न सन्मान सोहळा उत्साहात झाला. येथील वामनराव महाडिक विद्यालय येथे ही स्पर्धा झाली. स्पर्धेचे उद्घाटन शाळा समिती सदस्य शरद वायंगणकर यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी नीलेश सोरप, तळेरे चंद्रकांत जाधव, श्रेया जंगले, दत्तात्रय माडकर, अविनाश मांजरेकर, समीर राऊत, डॉ. प्रमोद घाडीगावकर, मनीष भालेकर, नवलसिंग तडवी, डी. सी. तळेकर, पी. एन. कानेकर, एस. एस. पडवळ, एस. सी. शेट्ये, ए. पी. कोकरे, ए. बी. कानकेकर, एस. यू. सुर्वे, आर. आर. खटावकर, रोहिणी जाधव, ए. एस. गोसावी, आर. जी. तांबे, के. डी. तळेकर, एस. आर. वानोळे, डी. यू. तळेकर, संदेश तळेकर, दीप्ती नारिंगरेकर आदी उपस्थित होते.

# फिफाने इस्त्रायलला ठोठावला दंड

**नवी दिल्ली** : फुटबॉलची जागतिक नियामक संस्था असलेल्या फिफाने, भेदभावविरोधी नियमांचे उघन केल्याबद्दल इस्त्रायली फुटबॉल फेडरेशनला दंड ठोठावला आहे. मात्र, वेस्ट बँक वसाहतींमधील क्लबना परवानगी दिल्याबद्दल इस्त्रायलला जागतिक फुटबॉलमधून निलंबित करण्याच्या पॅलेस्टाईनच्या विनंतीवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. दरम्यान, फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी इराण आपले विश्वचषक सामने अमेरिकेतून मेक्सिकोला हलवण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. फिफाने इस्त्रायली फुटबॉल फेडरेशनला १,९०,००० अमेरिकन डॉलर्स (अंदाजे १८ कोटी रुपये) दंड ठोठावला.

# आयपीएल सामन्यांची संख्या घटली

**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीगचा १९ वा हंगाम २८ मार्चपासून सुरू होत आहे. आयपीएलच्या पहिल्या काही सामन्यांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांचे वेळापत्रक येत्या काही दिवसांत जाहीर केले जाईल. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल सामन्यांची संख्या वाढवली असल्याच्या काही बातम्या सोशल मीडियावर पसरत आहेत. दरम्यान, आयपीएलने एका फँटसी लीगची घोषणा केली आहे. ज्यामध्ये चाहते स्पर्धेसाठी एक संघ तयार करू शकतात. यासाठी कोणत्याही पैशांची आवश्यकता नसली तरी, ते बक्षिसे जिंकू शकतात. याच्या अटी व शर्ती सोशल मीडियावर शेअर केल्या जात आहेत. ज्यानुसार लीग टप्प्यात ८० सामने खेळले जातील. तुम्हाला असा दावा करणाऱ्या अनेक पोस्ट्स आढळतील. आयपीएलमध्ये दोन नवीन संघांच्या समावेशानंतर चार सीझन खेळले गेले आहेत आणि प्रत्येक सीझनमध्ये अंतिम सामन्यासह ७० लीग सामने आणि चार प्लेऑफ सामने खेळले गेले आहेत. यावेळी, लीग टप्प्यात ८० सामने खेळले जातील असा दावा केला जात आहे, पण तसे नाही. जर ही माहिती यापूर्वी आयपीएलच्या अधिकृत वेबसाइटवर दिली गेली असेल, तर ती नक्कीच एक चूक असावी. आयपीएल फँटसी लीगच्या पेजवर फक्त ७० सामन्यांची नोंद आहे.

**पृथ्वीराज शिवराजचा एकतर्फी विजय** | **सिकंदरच्या लढतीसाठी रसिकांची उत्कंठा**

# महाराष्ट्र केसरीत मल्लांचा लौकिकानुसार खेळ

**। वाघोली । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा तिसरा दिवस गाजवला तो नामवंत पृथ्वीराज मोहोळ, पृथ्वीराज पाटील, हर्षवर्धन सदगीर, महेंद्र गायकवाड व शिवराज राक्षे यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर एकतर्फी विजय मिळवत घोडदौड कायम ठेवली. सिकंदर शेखनेही मैदान मारले. सुदर्शन कोतकरने चितपटीने विजय मिळवला. गेल्या तीन दिवसांपासून येथे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सुरू आहे.**



तब्बल पाच महाराष्ट्र केसरी मल्ल उतरले आहेत. त्यांनी आपापल्या लौकिकानुसार खेळ केला. शिवराज राक्षे विरुद्ध श्रेयसच्या लढतीत पहिल्या फेरीअखेर शिवराजने पाच गुणांची आघाडी घेतली होती. श्रेयच्या तीन गुण मिळाले. अखेर शिवराजने १० गुण घेत लढत एकतर्फी जिंकली. पृथ्वीराज पाटील विरुद्ध सत्पाल शिंदे (सांगली) यांच्या कुस्तीत पृथ्वीराजने पकड घेत दोन आघाडी घेतली. पुन्हा आक्रमण करून दोन गुण, खेमेवर दोन गुण, ताबा मिळवत दोन अशी एकूण नऊ गुणांची कमाई केली. एकंदरीत ११ गुणांनी आघाडीघेत पाटीलने लौकिकानुसार खेळ करीत पुढची फेरी गाठली. महेंद्र गायकवाडनेही आपल्या प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळवला. हर्षवर्धन सदगीर नाशिकनेही वेताळ शेळकेवर जय मिळवला. निष्क्रियेमुळे सदगीरला गुण मिळाला. वेताळने आक्रमण केले. मात्र, त्यातून सदगीरने अनुभवाच्या जोरावर ते परतून लावले. वेताळने गुण घेत खाते उघडले. हप्ते डावामुळे हर्षवर्धनने चार गुण घेतले. शेवटी सात गुणांनी विजय मिळवला.

सिकंदर शेख विरुद्ध मनीष रायतेच्या लढतीने रसिकांची उत्कंठा वाढवली. पहिल्या मिनिटात खडाखडीच झाली. सिकंदरसाठी ताकीद दिल्याने तो आक्रमक झाला. मात्र, गुण घेता आली नाही. मात्र, तो स्टेपआऊट झाल्याने मनीषला गुण मिळाला. मध्यंतरापर्यंत सिकंदरला गुण घेता आला नाही. मात्र, त्याने आक्रमक पवित्रा घेत ताबा मिळवला. परंतु मनीषने ते धुडकावून लावली.

बगल डूब मारून मनीषने मुसंडी मारली. मात्र, ती सिकंदरने प्रतिआक्रमण करून गुण घेतले. परिणामी गुणफलक चार विरुद्ध दोन झाल्याने कुस्ती सिकंदरच्या बाजूने फिरली. शेवटच्या टप्प्यातही त्याने अनुभव पणाला लावत गुणांची कमाई केली. पिछाडीवरून सिकंदरने विजयश्री खेचून आणल्याने कुस्तीप्रेमींनी त्याच्या कुस्तीचे टाळ्या वाजवून कौतुक केले.

गादी विभाग, दुसरी फेरी पृथ्वीराज मोहोळ (पुणे) विजयी विरुद्ध धीरज बारस्कर (धाराशिव) १२-२ शिवराज राक्षे (नांदेड) विजयी विरुद्ध श्रेयस होळकर (पुणे शहर) १०-० पृथ्वीराज पाटील (कोल्हापूर) विजयी झाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)